


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३०४ ■ गुरूवार, दि.१४ मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

## अकोलेकरांची दर महिन्याला 2 लाखांची लूट...!

### महापौर, उपमहापौर आणि आयुक्तांच्या गाड्या भाड्याने

प्रतिनिधी १४ मे

**अकोला :** एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी देशात 'इंधन बचत' आणि 'साधेपणा'चे आवाहन करत आहेत, तर दुसरीकडे अकोला महानगरपालिकेत मात्र अकोलेकरांच्या कष्टाच्या पैशांची अक्षरशः उधळपट्टी सुरू आहे. महापौर, उपमहापौर आणि आयुक्तांच्या आलिशान गाड्यांच्या भाड्यापोटी दरमहा तब्बल २ लाख रुपये खर्च केले जात आहेत. हा इंधन बचतीचा संदेश नसून सामान्य जनतेवर टाकलेला दिवसाढवळ्या दरोडा आहे, अशी संतप्त भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. प्रशासनाचा हा गाड्यांचा 'शौक' अकोल्याच्या विकासाला खिळ




#### महापालिकेच्या तिजोरीवर 'अर्थहीन' ओझे!

शहरातील विकासकामांसाठी निधी नसल्याचे रडगाणे गाणारे प्रशासन आपल्या स्वतःच्या गाड्यांच्या खर्चासाठी एवढा पैसा येतो कुठून, याचे उत्तर देईल का ? महापौर शारदा खेडकर आणि आयुक्तांच्या या गाड्यांवर होणारा खर्च हा अकोलेकरांच्या जखमेवर मीठ चोळणारा ठरत आहे. दोन लाख रुपये दरमहा वाहन भाडे देणे हा भ्रष्टाचार नाही का. सुधारणा कधी होणार? पीएम मोदींच्या आवाहनानंतर तरी महापालिका भाड्याच्या गाड्यांचा मोह सोडणार का. जनतेच्या पैशांची अशी उधळपट्टी होत राहिली, तर महापालिकेवर तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा अकोलेकरांनी दिला आहे.

#### नेत्यांच्या थाटासाठी जनतेचा पैसा कशासाठी?

मिळालेल्या माहितीनुसार, महापौर शारदा खेडकर, उपमहापौर अमोल आणि महापालिका आयुक्त यांच्यासाठी भाड्याने घेतलेल्या वाहनांवर दरमहा अवाढव्य खर्च केला जात आहे. अकोलेकर एकीकडे खराब रस्ते, कचरा आणि डासांच्या समस्यांशी झुंजत असताना, प्रशासनातील हे 'वरिष्ठ' मात्र अकोलेकरांच्या करातून गोळा झालेल्या पैशाने महागड्या गाड्यांतून फिरत आहेत. दर महिन्याला २ लाख रुपये म्हणजे वर्षाला २४ लाखांची ही उधळपट्टी कोणाच्या फायद्यासाठी? असा सवाल आता उपस्थित होत आहे. तर मोठ्या गाड्या सत्तर हजार रुपये आणि छोट्या गाड्या या ३० हजार रुपये महिन्याने भाड्याने घेतल्या आहेत. अशी माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने नाव गोपनिय ठेवण्याच्या अटीवर दिली.

#### मोदींचे आवाहन गेले कचऱ्यात ?

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच इंधन बचतीसाठी सायकल वापरण्याचे किंवा साधेपणाने राहण्याचे आवाहन केले होते. मात्र, अकोला महापालिकेत या आवाहनाचा उलटाच परिणाम पाहायला मिळत आहे. महापालिकेची आर्थिक स्थिती डबघाईला आली असतानाही, स्वतःच्या मालकीच्या गाड्या वापरण्याऐवजी भाड्याने महागड्या गाड्या घेण्याचा अट्टाहास का? यामागे एखादे मोठे 'वाहन भाडे रॅकेट' तर कार्यरत नाही ना ? अशी शंका आता व्यक्त केली जात आहे.

## उत्तर प्रदेशात वादळी वारे, ९४ जणांचा मृत्यू

**लखनऊ:** देशात दोन प्रकारच्या हवामानाचा अनुभव येत आहे. बुधवारी, प्रयागराज आणि अयोध्यासह उत्तर प्रदेशातील ३० जिल्ह्यांमध्ये वादळामुळे ९४ लोकांचा मृत्यू झाला. प्रयागराजमध्ये सर्वाधिक १७, तर भदोहीमध्ये १६ मृत्यूंची नोंद झाली. बरेली येथे ताशी ८० किमी वेगाने आलेल्या वादळाने एका तरुणाला आणि पत्र्याच्या शेडला उडवून लावले. राज्यातील बांदा शहरात तापमान ४५.४ अंश पर्यंत पोहोचले. आज ५१ जिल्ह्यांसाठी तीव्र वादळ आणि पावसाचा इशारा जारी करण्यात आला आहे. महाराष्ट्रात अकोल्यात बुधवारी ४५.९ अंश सेल्सिअस या विक्रमी तापमानाची नोंद झाली.

राजस्थानमध्येही तीव्र उष्णता आणि उष्णतेची लाट जाणवत आहे. बुधवारी सलग चौथ्या दिवशी जैसलमेर हे देशातील सर्वात उष्ण शहर ठरले, जिथे तापमान ४६.१ अंश पर्यंत पोहोचले. हवामान विभागाच्या माहितीनुसार, आज बिकानेर, जोधपूर, जैसलमेर आणि बारमेरमध्ये तीव्र उष्णतेसाठी रेड अलर्ट लागू आहे. १३ जिल्ह्यांसाठी उष्णतेच्या लाटेचा इशारा जारी करण्यात आला आहे. दरम्यान, मध्य प्रदेशातील २५ हून अधिक जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट पसरली असून, ती १८ मे पर्यंत कायम राहण्याची शक्यता आहे. बुधवारी खजुराहोमध्ये तापमान ४५.४ अंश होते. आज इंदूर, उज्जैन, धार आणि रतलाममध्ये उष्णतेच्या लाटेसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

## मुख्यमंत्री बुलेटवर

### साजीद खान यांनी केली बुलेट स्टार्ट





प्रतिनिधी १४ मे

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या ताफ्यातील गाड्या कमी करत इंधन बचतीच्या केलेल्या आवाहनाला कृतीतून संदेश दिल्यानंतर आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही आज एक आगळावेगळा आदर्श समोर ठेवला. फडणवीसांनी नेहमीचा मोठ्या गाड्यांचा ताफा आणि कडक सुरक्षा व्यवस्था बाजूला सारून ते चक्क बुलेट मोटारसायकलवरून विधानभवनात दाखल झाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतः बुलेट चालवत होते. तर त्यांच्या पाठीमागच्या सीटवर भाजपचे मुंबई अध्यक्ष आशिष शेलार स्वार झाले होते. पंतप्रधानांनी देशातील वाढता इंधन वापर कमी करण्यासाठी आणि पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी नागरिकांना शक्य तिथे इंधनाची बचत करण्याचे आवाहन केले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत प्रशासकीय स्तरावर आणि सर्वसामान्यांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी आज स्वतः दुचाकी चालवून विधानभवन गाठण्याचा निर्णय घेतला.

विधानपरिषदेतील नवनिर्वाचित सदस्यांचा विधानभवनात आज शपथविधीचा कार्यक्रम आहे. त्यासाठी मुख्यमंत्री शासकीय निवासस्थानावरुन बुलेटने निघाले. विधानभवनाच्या प्रवेशद्वारावर मुख्यमंत्री बुलेटवरून उतरताच तिथे उपस्थित असलेल्या आमदार, कर्मचारी आणि प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी गर्दी केली होती.

#### परदेश दौरे बंद अन् ताफा अर्ध्यावर!

मुख्यमंत्री फडणवीसांनी जागतिक ऊर्जा संकट आणि इंधन बचतीच्या पार्श्वभूमीवर कालच महत्त्वाचे आदेश दिलेत. ज्यात स्वतः मुख्यमंत्री, मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या ताफ्यातील गाड्यांची संख्या आता थेट निम्म्यावर आणण्याचा निर्णय घेतला. तसेच मंत्री, अधिकाऱ्यांचे विदेश दौरे रद्द करण्याचाही निर्णय घेण्यात आला.

#### व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठका!

इंधन आणि परकीय चलनाची बचत करण्याच्या उद्देशाने फडणवीसांनी काल दोन उच्चस्तरीय बैठका घेतल्या. या बैठकीला राज्याचे मुख्य सचिव, पोलीस महासंचालक आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ अंमलबजावणीचे आदेश दिले. आता मंत्रालयातील बैठकांसाठी अधिकाऱ्यांना जिल्ह्यांतून मुंबईला यावं लागणार नाही, तर या बैठका व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेतल्या जाणार आहेत.

## राहुल गांधींच्या ट्रिपचा खर्च ६० कोटी....!

वृत्तसंस्था १४ मे

**नवी दिल्ली :** काँग्रेस नेते राहुल गांधींच्या परदेश दौऱ्यांवरून भाजपाने त्यांच्यावर जोरदार हल्लाबोल करत त्यांच्या परदेशवाऱ्यांचा संपूर्ण रेकॉर्ड जनतेसमोर मांडला आहे. भाजपाचे नेते संबित पात्रा यांनी यावरून निशाणा साधला आहे. राहुल गांधी गेल्या २२ वर्षांत ५४ वेळा परदेश दौऱ्यावर गेले असून, त्यावर तब्बल ६० कोटी रुपयांहून अधिक खर्च करण्यात आला आहे. राहुल यांच्या या दौऱ्यांचं 'फंडिंग' कोणी केलं असा खोचक सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.

भाजपा नेते संबित पात्रा यांनी गुरुवारी राहुल गांधींच्या परदेश दौऱ्यांची सविस्तर माहिती जनतेला दिली. पात्रा यांच्या म्हणण्यानुसार, राहुल गांधी यांनी २००४ ते २०२६ या काळात एकूण ५४ पर्सनल परदेश दौरे केले आहेत. यामध्ये अमेरिका, इटली, युनायटेड किंगडम, जर्मनी, व्हिएतनाम, कंबोडिया, सिंगापूर, बहरीन, मालदीव, कतार आणि यूएई या देशांचा समावेश आहे. याशिवाय, ३ मे रोजी ते कोणतीही पूर्वकल्पना न देता मस्कत (ओमान) येथे गेले होते, ज्याचं फुटेज सोशल मीडियावर उपलब्ध आहे.

#### कमाईपेक्षा परदेश दौऱ्यांवर अधिक खर्च!

संबित पात्रा यांनी राहुल गांधींच्या निवडणूक प्रतिज्ञापत्राचा (फॉर्म २६) हवाला देत सांगितलं की, गेल्या १० वर्षांत त्यांचं एकूण घोषित केलेलं उत्पन्न ११ कोटी रुपये आहे. याउलट त्यांच्या परदेश दौऱ्यांचा खर्च ६० कोटी रुपये इतका आहे. राहुल गांधी आपल्या कमाईपेक्षा कितीतरी पटीने अधिक पैसे परदेश दौऱ्यांवर खर्च करत असल्याचा आरोप भाजपाने केला आहे. जर उत्पन्न मर्यादित आहे, तर या प्रचंड खर्चाचं फंडिंग कोण करत आहे आणि यामध्ये कोणत्याही परदेशी सोर्सचा हात आहे का? असा प्रश्न पात्रा यांनी विचारला आहे.

## महाराष्ट्रातील तिघांसह सात आरोपींना अटक

### नीट पेपरफुट प्रकरण; सीबीआयच्या तपासात माहिती समोर

प्रतिनिधी १४ मे

**पुणे :** नीट पेपर फुटीप्रकरणी आतापर्यंत देशभरात सीबीआयने ६ आरोपींना अटक केली आहे. विशेष म्हणजे यात महाराष्ट्रातील तीन जणांचा समावेश आहे. तसेच देशभरात अनेक ठिकाणी छापेही टाकण्यात आले आहेत. जयपूरमधून तीन, गुरुग्राममधून एक, पुणे, नाशिक आणि अहिल्यानगरमधून एक आशा एकूण सात आरोपींना अटक केली आहे. इतर अनेक संशयितांची चौकशी सुरू आहे. तसेच मोबाईल फोनसह अनेक इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि गुन्हेगारी पुरावा दर्शवणारी कागदपत्रे जप्त करण्यात आली आहे. नाशिकमधून शुभम खैरनार, अहिल्यानगरहून धनंजय लोखंडे तर आता पुण्यातून ओंकार शिंगोट, जयपूरमधून मांगीलाल बिवाल, विकास बिवाल आणि दिनेश बिवाल तर गुरुग्राममधून यश यादव अशा एकूण सात आरोपींना अटक करण्यात आली आहे.

शुभम खैरनारने करिअर काऊन्सिलिंगच्या नावाने वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांचे वर्तुळ तयार करून पेपरफुटीत 'एन्ट्री' केल्याची माहिती आहे. पुण्यातून त्याच्याकडे कुरिअरद्वारे पेपर पोहोचल्यानंतर शुभम खैरनारने टेलिग्रामवर हरियाणात त्याची विक्री केल्याचे तपासातून समोर आले आहे. धनंजय लोखंडे हा पुण्यात असताना त्याने कुरिअरद्वारे खैरनार याला नीटची प्रश्नपत्रिका पाठवली होती. प्रश्नपत्रिका मिळाल्यानंतर खैरनारने हरियाणा येथे टेलिग्रामद्वारे विक्री केली. दरम्यान, शुभम बीएएमएसच्या तिसऱ्या वर्षाला असून, करिअर कौन्सिलर म्हणून तो कार्यरत होता. शुभमने धनंजयकडून १० लाख रुपयांत प्रश्नपत्रिका खरेदी केल्यानंतर हरियाणातील गुरुग्राम येथील मध्यस्थीला १५ लाखांत विक्री केल्याचीही माहिती मिळाली आहे.



#### पेपरफुटीचे लातूर कनेक्शन

नीट पेपरफुटी प्रकरणातील लातूर कनेक्शनच्या चौकशीला आता अधिक वेग आला असून, पोलिसांनी तपासाची व्याप्ती वाढवली आहे. यापूर्वी चार जणांचे जबाब नोंदवण्यात आले होते. काल उशिरापर्यंत आणखी दोन जणांची चौकशी करण्यात आली. त्यामुळे आतापर्यंत एकूण सहा जणांचे जबाब पोलिसांनी नोंदवले आहेत. परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या हस्तलिखित पेपरची निर्मिती नेमकी कोणी केली. तो कुठून आला आणि त्यामागे कोणाचा सहभाग होता याचाही तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

## आजपासून साखर निर्यातीवर बंदी!

वृत्तसंस्था १४ मे

**नवी दिल्ली :** देशांतर्गत साखरेचा पुरवठा सुरळीत राखण्यासाठी केंद्र सरकारने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. एका अधिसूचनेद्वारे, सरकारने साखरेच्या निर्यातीवर तात्काळ बंदी लागू केली आहे. यामध्ये कच्ची साखर, पांढरी साखर आणि शुद्ध साखर यांचा समावेश असणार आहे. ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत किंवा पुढील आदेश येईपर्यंत साखर निर्यातीवर बंदी लागू असणार आहे. देशांतर्गत बाजारपेठेत साखरेच्या किमतींवरचा दबाव वाढत आहे. त्यामुळे साखर निर्यातीवर निर्बंध घालून, देशांतर्गत साखरेचा पुरवठा सुधारेल आणि किमती नियंत्रणात राहतील.

## आता नागपूर विमानतळ होणार मल्टीमॉडेल पॅसेंजर, कार्गो हब!

### विमानतळ जीएमआरला हस्तांतरित होणार ; 4 हजार मीटर लांबीची नवीन धावपट्टी

प्रतिनिधी १४ मे

**नागपूर :** नागपूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या आधुनिकीकरणासाठी भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या जमिनीच्या वाढीव कालावधीच्या भाडेपट्ट्याला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्यामुळे ३० वर्षासाठी जीएमआर समूहाकडे विमानतळाचे संचालन व विकासाचे हक्क सोपवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. २६०० एकरांतील ७,६०० कोटी रुपयांच्या या प्रकल्पांतर्गत दोन टप्प्यांत नवीन टर्मिनल आणि नवी धावपट्टी उभारली जाणार आहे.



आता नागपूर विमानतळ खऱ्या अर्थाने होणार मल्टीमॉडेल पॅसेंजर व कार्गो हब होणार आहे.

नागपूर विमानतळाचे जीएमआर समूहाकडे हस्तांतरण तातडीने होणार असून, संपूर्ण विकास एकूण ८ वर्षांच्या कालावधीत दोन प्रमुख टप्प्यांत पूर्ण केला जाईल. पहिल्या टप्प्यातील विकासकामांमध्ये सध्याच्या ३२०० मीटर लांबीच्या धावपट्टीला समांतर ४ हजार मीटर लांब आणि ६० मीटर रुंद दुसरी धावपट्टी उभारण्यात येईल. सोबतच आंतरराष्ट्रीय दर्जाचे कार्गो टर्मिनल तसेच प्रवासी सुविधा उभ्या राहतील. विमानतळावरील नवीन एकात्मिक टर्मिनलमध्ये प्रवाशांची वार्षिक क्षमता ४ कोटी गृहित धरण्यात आली आहे. शिवणगाव येथे ७५ हजार चौरस मीटर क्षेत्रफळाची नवी टर्मिनल इमारत बांधली जाणार आहे. टॅक्सी-वे, ॲप्रोच रोड, पार्किंग आणि प्रवाशांना आवश्यक सोयीसुविधा यामध्ये उपलब्ध असतील.

#### २० हजार मेट्रिक टन क्षमतेचे कार्गो टर्मिनल

विमानतळावर सद्यस्थितीत १७ विमाने उभी राहू शकतात. पुढील चार वर्षात आणखी १६ प्रवासी व दोन कार्गो विमाने उभी राहू शकतील. मालवाहतुकीला चालना देण्यासाठी २० हजार मेट्रिक टन क्षमतेचे कार्गो टर्मिनल उभारण्यात येईल. पायाभूत सुविधांमध्ये सुधारणांसह नवीन प्रवेश रस्ते, एअरसाइड सुविधा, पार्किंग, हॉटेल्स आणि अन्य आनुषंगिक सुविधा राहतील. वाढीव संख्येतील विमानांचे नियमन व संचलनासाठी नवीन एअर ट्रॅफिक कंट्रोल (एटीसी) टॉवर उभारण्यात येईल.

'मुख्यमंत्र्यांच्या प्रयत्नांना यश केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाल्याने नागपूर विमानतळ आता खऱ्या अर्थाने मल्टीमॉडेल पॅसेंजर व कार्गो हब होणार आहे. यासाठी राज्य शासन व प्रशासनाच्यावतीने अनेक वर्षांपासून प्रयत्न सुरू होते. अखेर हे प्रयत्न फळाला आले. याचे संपूर्ण श्रेय हे मुख्यमंत्री फडणवीस यांनाच आहे. त्यांनी यासाठी दिल्लीस्तरावर बराच पाठपुरावा केला.'

**- डॉ. विपीन इटनकर,**
मनपा आयुक्त नागपूर



सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
गुरुवार, दि. १४ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

मराठ्यांच्या इतिहासात शौर्य, पराक्रम, त्याग, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेची असंख्य तेजस्वी उदाहरणे आढळतात. या परंपरेमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करून भारतीय इतिहासात अभूतपूर्व कार्य केले. मात्र या स्वराज्याचे रक्षण करताना आपल्या प्राणांची आहुती देणारे, संकटांना न डगमगता सामोरे जाणारे आणि मृत्यूला देखील हसत स्वीकारणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे छत्रपती संभाजी महाराज होय. १४ मे हा दिवस छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात आणि देशभरात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका राजाचा जन्मदिन नसून स्वाभिमान, विद्वत्ता आणि अपराजित धैर्य यांच्या स्मरणाचा दिवस आहे. छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म १४ मे १६५७ रोजी पुरंदर किल्ल्यावर झाला. त्यांचे बालपण हे अत्यंत संघर्षमय आणि आव्हानात्मक परिस्थितीत गेले. त्यांचे वडील छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य उभारणीच्या कार्यात सतत व्यस्त होते, तर माता सईबाईंचे निधन संभाजी महाराज लहान असतानाच झाले.

# छत्रपती संभाजी महाराज : पराक्रमाचे तेजस्वी प्रतीक



जिजाऊंच्या सान्निध्यात त्यांच्यामध्ये राष्ट्रप्रेम, शौर्य आणि न्यायप्रियता यांचे संस्कार रुजले. बालपणापासूनच संभाजी महाराज अत्यंत बुद्धिमान, पराक्रमी आणि अभ्यासू होते. त्यांना अनेक भाषा अवगत होत्या. संस्कृत, फारसी, मराठी, हिंदी आणि पोर्तुगीज भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. त्यांनी अल्पवयातच 'बुधभूषण' हा संस्कृत ग्रंथ लिहिला. यावरून त्यांच्या विद्वत्तेची कल्पना येते.

संभाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व केवळ योद्ध्याचे नव्हते, तर ते एक कुशल प्रशासक, अभ्यासू साहित्यिक आणि दूरदृष्टी असलेले राजकारणी होते. त्यांच्या आयुष्यातील अनेक प्रसंग हे संघर्ष आणि कटकारस्थानांनी भरलेले होते. आग्रा येथे औरंगजेबाच्या कैदेतून सुटका करताना त्यांनी दाखवलेले धैर्य उल्लेखनीय होते. शिवाजी महाराजांसोबत त्यांनी संकटांना सामोरे जात स्वराज्याचे धडे घेतले. बालवयातच त्यांनी युद्धकला, राजकारण आणि प्रशासन यांचे शिक्षण घेतले. त्यामुळे पुढे राज्यकारभार सांभाळताना त्यांना अनेक अनुभवांचा उपयोग झाला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर स्वराज्यावर मोठे संकट आले. अंतर्गत राजकीय मतभेद आणि बाह्य शत्रूंचे आक्रमण अशा कठीण परिस्थितीत संभाजी महाराजांनी स्वराज्याची धुरा सांभाळली. १६८१ मध्ये त्यांचा राज्याभिषेक झाला आणि त्यांनी स्वराज्याच्या रक्षणासाठी स्वतःला पूर्णपणे वाहून घेतले. त्यांच्या कारकिर्दीचा काळ हा अत्यंत संघर्षमय होता. मुघल सम्राट औरंगजेबाने दक्षिणेत उतरून मराठ्यांचे राज्य संपविण्याचा निर्धार केला होता. त्याच वेळी सिद्दी, पोर्तुगीज आणि इंग्रज यांच्याशीही संघर्ष सुरू होता. अशा परिस्थितीत संभाजी महाराजांनी धैर्याने आणि चातुर्याने शत्रूंना तोंड दिले.

१६८९ मध्ये संगमेश्वर येथे आपल्यातीलच काहींच्या फितुरीमुळे संभाजी महाराज आणि कवी कलश मुघलांच्या ताब्यात गेले. औरंगजेबाने त्यांना अमानुष छळ दिला. त्यांच्या डोळ्यांसमोर अत्याचार करण्यात आले, शरीराचे हाल करण्यात आले, तरीही त्यांनी स्वाभिमान सोडला नाही. अखेर ११ मार्च १६८९ रोजी त्यांची क्रूर हत्या करण्यात आली. मात्र त्यांच्या बलिदानामुळे मराठ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आणि स्वराज्य अधिक बळकट झाले.

संभाजी महाराजांच्या विद्वत्तेचा विचार केला तर ते त्या काळातील अत्यंत अभ्यासू राजांपैकी एक होते. त्यांनी संस्कृत साहित्याचा सखोल अभ्यास केला होता. 'बुधभूषण' या ग्रंथामध्ये त्यांनी राजकारण, नीतिशास्त्र आणि प्रशासन यांवर विचार मांडले आहेत. युद्धाच्या धामधुमीतही साहित्य आणि ज्ञान यांच्याशी त्यांची नाळ जोडलेली होती. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक व्यापक आणि प्रेरणादायी ठरते. संभाजी महाराजांनी मराठा साम्राज्य टिकवून ठेवण्यात मोलाची भूमिका बजावली. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचे रक्षण करणे हे अत्यंत कठीण काम होते. कारण मुघल साम्राज्य त्या काळी अत्यंत बलाढ्य होते. औरंगजेब स्वतः दक्षिणेत उतरला होता. अशा परिस्थितीत संभाजी महाराजांनी जवळपास नऊ वर्षे संघर्ष करत स्वराज्य टिकवून ठेवले. त्यांनी कधीही शत्रूपुढे शरणागती पत्करली नाही. त्यांच्या नेतृत्वामुळे मराठ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांनी औरंगजेबाला प्रखर प्रतिकार केला. संताजी घोरपडे, धनाजी जाधव आणि इतर मराठा सरदारांनी मुघल सैन्याला हैराण केले. अखेरीस औरंगजेबाचा दक्षिणेतील मोहिमेमध्ये पराभव झाला. यामागे संभाजी महाराजांनी निर्माण केलेली प्रेरणा आणि स्वराज्यनिष्ठा कारणीभूत होती.

छत्रपती संभाजी महाराजांचे जीवन आजच्या तरुण पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. आजच्या काळात स्वार्थ, भौतिकता आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास दिसून येतो. अशा वेळी संभाजी महाराजांचे जीवन आपल्याला राष्ट्रप्रेम, धैर्य, संघर्षशीलता आणि नीतिमूल्यांची जाणीव करून देते. त्यांनी संकटांना घाबरून न जाता त्यांचा सामना केला. त्यांनी परिस्थितीसमोर कधीही हार मानली नाही. हा संदेश आजच्या युवकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

आज महाराष्ट्रात आणि देशभरात संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. संभाजी महाराजांचा इतिहास हा केवळ युद्धांचा इतिहास नाही, तर तो संस्कृती रक्षणाचा इतिहास आहे. त्यांनी हिंदवी स्वराज्याच्या माध्यमातून सर्व समाजघटकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या सैन्यात विविध जाती-धर्मांचे लोक होते. त्यांनी कधीही जातीय किंवा धार्मिक द्वेषाला प्रोत्साहन दिले नाही. न्याय, समानता आणि स्वराज्य हीच त्यांची भूमिका होती. संभाजी महाराजांच्या काळात मराठा आरमारालाही महत्त्व होते. सिद्दी आणि पोर्तुगीज यांच्याविरुद्ध त्यांनी समुद्री संरक्षण मजबूत करण्याचा प्रयत्न केला. किनारपट्टीवरील किल्ले आणि व्यापार यांचे रक्षण करण्यासाठी त्यांनी उपाययोजना केल्या. यावरून त्यांच्या प्रशासनातील दूरदृष्टी स्पष्ट होते. संभाजी महाराजांचे जीवन हे त्यागाचे सर्वोच्च उदाहरण आहे. त्यांनी स्वतःच्या सुखाचा कधी विचार केला नाही. स्वराज्य आणि धर्मरक्षण हेच त्यांचे ध्येय होते. मृत्यू समोर असतानाही त्यांनी आपल्या तत्त्वांशी तडजोड केली नाही. त्यामुळे ते भारतीय इतिहासातील अमर वीर ठरतात. आजही महाराष्ट्रातील गड-किल्ले संभाजी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देत उभे आहेत. प्रत्येक किल्ला त्यांच्या संघर्षाची कहाणी सांगतो. त्यांच्या स्मृती आजही जनमानसात जिवंत आहेत. गावागावांतून त्यांच्या जयंतीनिमित्त उत्साह दिसून येतो. युवकांच्या मनात त्यांच्याविषयी विशेष आकर्षण आणि आदर आहे.

संभाजी महाराजांचे विचार समाजाला एकत्र आणणारे आहेत. त्यांनी अन्यायाविरुद्ध संघर्ष केला, पण कधीही मानवतेचा त्याग केला नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात शौर्याबरोबरच संवेदनशीलताही होती. प्रजेच्या कल्याणासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले. त्यामुळे ते लोकाभिमुख राजा म्हणूनही ओळखले जातात. छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त त्यांचे कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज आहे. शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांनी त्यांच्या जीवनावर आधारित अभ्यास, व्याख्याने आणि उपक्रम आयोजित करणे आवश्यक आहे. इतिहासाचे योग्य ज्ञान मिळाल्यास युवकांमध्ये राष्ट्रप्रेम आणि सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण होईल. छत्रपती संभाजी महाराजांचे जीवन हे एका जाज्वल्य राष्ट्रभक्ताचे जीवन होते. त्यांनी स्वतःच्या प्राणांची पर्वा न करता स्वराज्याचे रक्षण केले. त्यांच्या बलिदानामुळे मराठा साम्राज्य अधिक मजबूत झाले आणि पुढे पेशव्यांच्या काळात मराठ्यांनी दिल्लीपर्यंत झेंडा फडकवला. त्यामुळे संभाजी महाराजांचे योगदान मराठा साम्राज्याच्या विस्तारामध्ये अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य केले पाहिजे. भ्रष्टाचार, अन्याय, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता यांविरुद्ध लढण्याची प्रेरणा त्यांच्या जीवनातून मिळते. स्वाभिमानी, चारित्र्यसंपन्न आणि राष्ट्रनिष्ठ नागरिक घडविणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

छत्रपती संभाजी महाराज हे भारतीय इतिहासातील अजरामर व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचे शौर्य, विद्वत्ता आणि बलिदान यामुळे ते सदैव जनमानसात जिवंत राहतील. १४ मे रोजी साजरी होणारी त्यांची जयंती ही केवळ उत्सव नसून प्रेरणेचा आणि स्वाभिमानाचा दिवस आहे. त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करताना आपण त्यांच्या आदर्शांचे पालन करण्याचा निर्धार केला पाहिजे. राष्ट्र आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी आवश्यक असलेली जिद्द, धैर्य आणि निष्ठा यांचे तेजस्वी उदाहरण म्हणून छत्रपती संभाजी महाराजांचे नाव भारतीय इतिहासात सदैव सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
समाजशास्त्राचे अभ्यासक

# राज्य विमा योजनेच्या रुग्णालयांमधील आरोग्य सुविधांचा लाभ प्रत्येक कामगारापर्यंत पोहोचवा

## कामगार मंत्री अॅड. आकाश फुंडकर यांचे निर्देश

**मुंबई :** राज्यातील प्रत्येक कामगाराला त्याच्या हक्काच्या आरोग्य सुविधा मिळाव्यात. यासाठी 'कर्मचारी राज्य विमा योजनेच्या रुग्णालयांमधील वैद्यकीय सुविधांचा लाभ शेवटच्या कामगारापर्यंत पोहचविण्यात यावा, असे निर्देश कामगार मंत्री ?ड. आकाश फुंडकर यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले आहेत. राज्यातील विमाधारक कामगारांची वाढती संख्या लक्षात घेता, आरोग्य सुविधांचा विस्तार आणि जनजागृतीवर करण्याच्या सूचनाही मंत्री फुंडकर यांनी दिल्या.



बैठकीस सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर , कामगार आयुक्त एच. पी तुम्मोड, कर्मचारी राज्य विमा महामंडळाच्या प्रादेशिक संचालक अभिलाषा झा , उपसचिव रोशनी कदम, भारतीय मजूर संघाचे अनिल डोमणे आदी उपस्थित होते. बैठकीत कामगार मंत्री म्हणाले, केंद्रीय कामगार विभागाच्या माध्यमातून राज्यात कर्मचारी राज्य विमा योजनेतंर्गत १८ नवीन रुग्णालयांना मंजुरी देण्यात आली आहे. या रुग्णालयांमुळे कामगारांना त्यांच्या निवासस्थानाजवळ किंवा कामाच्या ठिकाणी तातडीने उपचार मिळणे सुलभ होणार आहे. तसेच आरोग्य शिक्षणाला चालना देण्यासाठी आणि तज्ज्ञ डॉक्टरांची उपलब्धता वाढवण्यासाठी अंधेरी (मुंबई), पुणे आणि नागपूर येथे नवीन वैद्यकीय महाविद्यालये सुरू करण्यात येत आहेत. ही महाविद्यालये आणि रुग्णालये कामगारांसाठी आरोग्य सुविधेचा मोठा आधार ठरतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

केवळ सुविधा निर्माण करून चालणार नाही, तर त्याची माहिती कामगारांपर्यंत पोहोचणे ही काळाची गरज असल्याचे सांगत कामगार मंत्री म्हणाले, प्रत्येक विमाधारक कामगाराच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर जवळच्या रुग्णालयाची माहिती, उपलब्ध सुविधा याची माहिती पाठवावी. याद्वारे कामगारांमध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती निर्माण होईल. तसेच आपत्कालीन वैद्यकीय परिस्थितीत त्यांच्यासाठी असलेल्या रुग्णालयांची मदत त्यांना होईल.

सध्या राज्यात साधारण ४९ लाख विमाधारक कामगार आहेत. मात्र, केंद्र सरकारच्या नवीन कामगार कायद्याची अंमलबजावणीनंतर या संख्येत लक्षणीय वाढ होणार आहे. वाढणाऱ्या या कामगार वर्गाला दर्जेदार आरोग्य सेवा पुरवण्यासाठी यंत्रणेने आतापासूनच सज्ज व्हावे, असे आवाहनही कामगार मंत्र्यांनी केले. कामगारांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही आणि मंजूर झालेली रुग्णालये लवकरात लवकर कार्यान्वित करण्याला प्राधान्य दिले जाईल, असेही अॅड. आकाश फुंडकर यांनी स्पष्ट केले.

या बैठकीला कामगार विभागाचे वरिष्ठ सचिव, विमा योजनेचे आयुक्त आणि संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# पानगळ: निसर्गाचा एक सुंदर आणि अर्थपूर्ण बदल

'पानगळ' हा निसर्गातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि नयनरम्य ऋतू बदल आहे. सामान्यतः शिशिर ऋतूमध्ये झाडांची पाने गळून पडतात, ज्याला आपण 'पानगळ' म्हणतो. हा काळ केवळ पाने गळण्याचा नसून, तो झाडांच्या पुनर्जन्माची पूर्वतयारी असतो.

निसर्गाच्या चक्रानुसार, हिवाळा संपताना आणि उन्हाळा सुरू होताना हवेतील आर्द्रता कमी होते. पाण्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे झाडांना स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवणे कठीण जाते. पाने झाडांमधील पाण्याचे बाष्पीभवन करत असतात. त्यामुळे, पाणी वाचवण्यासाठी आणि कडक उन्हाळ्यात जगण्यासाठी झाडे आपली पाने गाळून टाकतात. ही झाडांची एक प्रकारची 'सुप्तावस्था' असते. पानगळीच्या काळात निसर्गाचे रूप पूर्णपणे पालटते. हिरवीगार दिसणारी झाडे हळूहळू पिवळी, तांबूस किंवा तपकिरी होऊ लागतात. वाळलेली पाने जमिनीवर पडल्यामुळे जमिनीवर जणू पानांचा सतरंजीचा थर पसरल्यासारखा वाटतो. वाऱ्याच्या झुळुकीसोबत पानांचा होणारा 'सळसळ' आवाज मनाला एक वेगळीच शांतता देतो.

**अकोट नगरपरिषद, अकोट**
**जिल्हा – अकोला (महाराष्ट्र)**
Email-akotinc@gmail.com

**ई–निविदा सूचना (दुसरी वेळ)**

नगरपरिषद, अकोट बांधकाम विभाग अंतर्गत मुख्याधिकारी यांचे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत TENDER ID :- 1) 2026_DMA_1302521_1 2) 2026_DMA_1302539_1 3) 2026_DMA_1302557 4) 2026_DMA_1302585_1 व सर्वसाधारण रस्ता अनुदान अंतर्गत 2026_DMA_1302603_1 व या कामांची ई निविदा दिनांक १४/०५/२०२६ नुसार ऑनलाइन पध्दतीने प्रपत्रामध्ये निविदा मागविण्यात येत आहे सदर कामाचे प्रपत्र www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि. १४/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. ते दि. २१/०५/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत भरता येईल. तसेच शक्य झाल्यास दिनांक २२/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता www.mahatenders.gov.in या संकेंर्त स्थळावर कार्यालय नगरपरिषद, अकोट मध्ये उघडण्यात येईल.

**शशिकांत मारोती बाबर (मशप्रसे)**
**मुख्याधिकारी गट–अ**
**नगरपरिषद, अकोट**

# कस्तुरीचा जागतिक परिचारिका दिन : वर्षा गिरी आणि अश्विनी जाधव यांना 'सदाफुली' पुरस्कार प्रदान



आद्य परिचारिका फ्लोरेन्स नाइटिंगल यांची १२ मे रोजी जयंती ..जागतिक स्तरावर परिचारिकांच्या अमूल्य योगदानासाठी , जगभरातील परिचारिकांचं महत्त्व अधोरेखित करण्यासाठीआणि आरोग्य सेवा सातत्यातील योगदानासाठी , आंतरराष्ट्रीय स्तरावर जागतिक परिचारिका दिन साजरा करण्यात येतो. रुग्णांची सेवा , कल्याण व सुरक्षितता यासाठी सर्व रुग्णालयांमध्ये डॉक्टरांच्या बरोबर परिचारिकांची भूमिका देखील महत्त्वाची असते . त्यांच्या कार्याचा गौरव व सेवावृत्ती विषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कस्तुरीच्या वतीने जागतिक परिचारिका दिन साजरा करण्यात आला.

परिचारिकांचे परिश्रम आणि निस्वार्थ समर्पणआरोग्य सेवा प्रणालीचा भक्कम पाया आहे. साथीच्या काळात त्यांच्या विलक्षण त्यागाची अनेक उदाहरण मानव जातीला प्रेरणा देणारी आहेत. अशा या महान सेवाकार्याची दखल म्हणून कस्तुरी या सेवाभावी संस्थेच्या वतीने आरोग्य सेवा क्षेत्रात समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या सौ.वर्षा गिरी आणि श्रीमती अश्विनी जाधव या दोन परिचारिकांचा 'सदाफुली' पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला....

ज्याप्रमाणे ' सदाफुली ' ही वनस्पती वर्षभर बहरत असताना तिच्या अंतर्भूत सद्गुणांचा समाजाला अविरत उपयोग होत असतो .' त्याचप्रमाणे ' परिचारिका देखील ऊन , वारा, पाऊस याची पर्वा न करता वर्षभर रुग्णांची सेवा करत असते...

म्हणून मागील ३० वर्षापासून समर्पित भावनेने सेवा करणाऱ्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोच्च रुग्णालयातील परिसेविका सौ. वर्षा सुनील सुनील गिरी व जिल्हा स्त्रियांचे रुग्णालयातीअधिपरिचारिका श्रीमती अश्विनी राजेश जाधव.. यांना त्यांच्याअविश्रांत व निरपेक्ष सेवावृत्तीची दखल घेऊन ' सदाफुली' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुरस्काराचे स्वरूप शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह असे होते. याप्रसंगी कस्तुरीच्या सदस्या सौ. संगीता जोध यांना सर्वोपचार रुग्णालय प्रशासनाने ' उत्कृष्ट परिचारिका' हा पुरस्कार दिल्याबद्दल त्यांचाही कस्तुरीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कस्तुरीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. किशोर बुटोले यांनी आपल्या प्रास्ताविकातून कस्तुरीचे सेवाकार्य , रुग्णांच्या सेवेतील परिचारिकांची भूमिका आणि सदाफुली पुरस्कार यांविषयी भूमिका मांडली. कस्तुरीच्या सदस्या सौ.संगीता जोध यांनी सदाफुली पुरस्कार प्राप्त परिचारिकांचा परिचय करून दिला...सौ. वर्षा गिरी व अश्विनी जाधव यांनी कस्तुरीच्या वतीने करण्यात आलेला सन्मान ही आम्ही केलेल्या सेवाकार्याची पावती असून संस्थेने घेतलेली दखल ही प्रेरणादायी आहे व कौतुकाची थाप आहे..असे उद्गार या प्रसंगी काढले.. या प्रसंगी माजी आमदार वसंतराव खोटरे ,संजय गायकवाड ,राजेश्वर पेठकर ,अनिल पालवे , संजय बुटोले, दीपक झाडे , प्रा.उज्वला वाजपेयी, चेतना आनंदानी , अपर्णा काळे ,अनिता इधोळ , संगीता जोध व किशोर बांधवकर आदी मान्यवर उपस्थित होते...कार्यक्रमास दोन्ही परिवारातील आप्त व स्नेही मोठ्या प्रमाणात उपस्थित होते..

## दिन विशेष

# फेसबुकची स्थापना करणारे सर्वात कमी वयाचे अब्जाधीश!

## मार्क झुकरबर्ग यांचा आज जन्मदिवस

मार्क झुकरबर्ग यांचा जन्म १४ मे १९८४ मध्ये व्हाईट प्लेन्स, न्यू यॉर्क,अमेरिका येथे झाला. मार्क इलियट झुकरबर्ग हे एक अमेरिकन उद्योजक असून फेसबुक या लोकप्रिय 'सोशल नेट्वर्किंग' संकेतस्थळाचा सहसंस्थापक म्हणून प्रसिद्ध आहेत. हार्वर्ड विद्यापीठात शिकत असताना मार्कने आपले वर्गमित्र डस्टिन मोस्कोविट्ज, एड्युअर्डो सार्विन आणि ख्रिस ह्युजेस यांच्या सोबत फेसबुकची स्थापना केली.

सध्या मार्क जगातील सगळ्यात लहान वयाचा अब्जाधीश आहे. त्या बरोबर माउंटन व्ह्यू ह्या शहरामध्ये मुख्यालय असलेल्या व्हॉट्सअ?पला २०१४ साली फेसबुक कंपनीने विकत घेतले. इन्स्टाग्राम आणि ऑकुलस व्ही आर पण फेसबुकच्या नावाखाली आले आहेत. नोव्हेंबर २०१७ पर्यंत त्यांची संपत्ती ७४.२ अब्ज अमेरिकी डॉलर एवढी होती आणि २०१६ मध्ये फोर्ब्सने जगातील पाचव्या क्रमांकाचा सर्वात श्रीमंत व्यक्ती म्हणून गणना केली होती. ४ फेब्रुवारी २००४ रोजी झुकरबर्गने आपल्या हार्वर्ड युनिव्हर्सिटीच्या वसतीगृहात खोलीतून फेसबुक लॉंच केले. त्याच्या महाविद्यालयीन खोलीत आणि हार्वर्डमधील विद्यार्थी एडुआर्डो सेव्हरिन, अँड्र्यू मॅककुलम, डस्टिन मॉस्कोविट्झ आणि ख्रिस ह्युजेस यांनी त्यांची मदत केली. त्यानंतर गटाने इतर कॉलेज कॅम्पसमध्ये फेसबुकची ओळख दिली. २०१२ पर्यंत फेसबुकने एक अब्ज लोक पोहोचले होते. दरम्यानच्या काळात, फेसबुकवर विकासाच्या प्रक्रियेदरम्यान त्यांच्या सहभागावर आधारित कंपनीचा वाटा असलेल्या झुकरबर्गला विविध कायदेशीर वाद-विवादांमध्ये सहभागी होता. डिसेंबर २०१२ मध्ये, झुकरबर्ग आणि त्याची पत्नी प्रिस्किला चॅनने जाहीर केले की त्यांच्या जीवनावरील कालावधी त्यांना 'द प्रोव्हिंग प्लेज'च्या आत्म्यात 'मानवी क्षमतेला पुढे वाढवून समानतेचा प्रचार' करण्यासाठी त्यांच्या संपत्तीचा बहुमान देईल. १ डिसेंबर २०१५ रोजी, त्यांनी घोषणा केली की अखेरीस त्यांना त्यांच्या फेसबुक समभागांची ९९ टक्के रक्कम (यावेळी सुमारे ४५ बिलियन अमेरिकन डॉलर्स) चॅन झुकेरबर्ग इनिशिएटिव्हला देईल. २०१० पासून टाईम मासिकाने त्याच्या पर्सन ऑफ द इयरच्या पुरस्काराचा भाग म्हणून जगातील १०० श्रीमंत आणि सर्वात प्रभावशाली लोकांमध्ये झुकरबर्ग यांचा समावेश केला आहे. डिसेंबर २०१६ मध्ये फॉरबसच्या जगातील सर्वात शक्तिशाली व्यक्तींच्या यादीत झुकेरबर्ग १० व्या स्थानावर होता.

झुकरबर्गचा जन्म १९८४ मध्ये न्यू यॉर्क येथील व्हाइट प्लेन्स येथे झाला. तो क्रेन (के.एम. केम्नर), मानसोपचार तज्ञ, आणि द डेंटिस्ट एडवर्ड झकरबर्ग यांचा मुलगा आहे. त्याचे पूर्वज जर्मनी, ऑस्ट्रिया आणि पोलंड येथे आले. तो आणि त्याच्या तीन बहिणींनी, रांडी, डोना आणि एरिले, न्यू यॉर्कमधील मिडटाऊन मॅनहॅटनच्या २१ मैलांवर असलेल्या एका छोट्या वेस्टचेस्टर काउंटी गावातील डोब्से फेरी या ठिकाणी वाढवले. झुकरबर्ग ज्यूइस्ट झाला आणि १३ वर्षांचा झाल्यावर तो बार मिट्ज्वा झाला. आड्स्ले हायस्कूलमध्ये, झुकरबर्गने वर्गांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली. त्यांनी न्यू हॅम्पशायरमधील खास खाजगी शाळेत फिलिप्स एक्झीटर अकादमीमध्ये बदली केली, ज्यात त्यांनी ज्युनिअर वर्षात विज्ञान (गणित, खगोलशास्त्री, आणि भौतिकशास्त्र) आणि शास्त्रीय अभ्यासातील पुरस्कार जिंकले. युवकांमध्ये त्यांनी जॉन्स हॉपकिन्स सेंटर फॉर प्रतिभावान युवक ग्रीष्मकालीन छावणीतही भाग घेतला. त्याच्या कॉलेज ॲप्लिकेशनमध्ये जकरबर्ग यांनी फ्रेंच, हिब्रू, लॅटिन आणि प्राचीन ग्रीक वाचन आणि लिहायला सांगितले. तो कुंपण संघाचा कर्णधार होता.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.
त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला

गुरुवार, दि. १४ मे २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

## आठवडी बाजारातील भोपळे यांच्या गोठ्यातून म्हैस चोरी

**हिवरखेड :** परिसरात दिवसेंदिवस गुरे चोरीचे प्रमाण वाढत चालले आहे, या अगोदर हिवरखेड पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या काळेगावं गोठ्यातून गाय लंपास झाली होती, तर गावातील स्टेट बँकेच्या मागे एका निराधार महिलेच्या घरून वासरू लंपास झालं होतं, तसेच अकोली, भोकर, तळेगांव बाजार येथील गोवंश चोरीचा अजूनही तपास लागलेला नाही, तळेगांव येथे तीन गुरे चोरीला गेले होते, त्यातील एक बैल आढळून आला, ही गुरे चोरी करणारी टोळी पोलिसांनी तत्काळ जेरबंद करावी अशी मागणी नुकसानग्रस्त गुरे मालक करीत आहेत, हिवरखेड आठवडी बाजारातून महागड्या म्हशी चोरी जाणे हे पोलिसां समोर मोठे आव्हान ठरते आहे.



# कृषीनगरात नाल्यातील पाणी रस्त्यावर

## पावसाळ्यापूर्वीच निघाली स्वच्छतेची लक्तरे

प्रतिनिधी १४ मे

**अकोला :** कृषीनगरातील नाल्या तुंबल्याने घाण पाणी रस्त्यावर येत आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळ चालला आहे. पावसाळ्यापूर्वी या भागातील स्वच्छतेची लक्तरे निघाली आहे. महापालिका प्रशासनाने याकडे त्वरित लक्ष द्यावे अशी मागणी केली जात आहे.

परिसरातील नागरिक दररोज समस्यांना सामोरे जात आहे. नगरसेवकाने समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी आहे. परंतु नगरसेवक फोन उचलत नाहीत अशी नागरिकांची तक्रार आहे. घरे, दुकाना समोर घाण पाणी साचले आहे. त्यामुळे लोकांना घाण पाण्यातून ये जा करावी लागते. आताच अशी स्थिती आहे तर पुढे पावसाळ्यात काय अवस्था राहील ही कल्पना अंगावर शहारे आणणारी आहे.

नागरी समस्या सोडविण्यासाठी प्रभागातील नगरसेवकांनी वेळीच लक्ष द्यावे अशी मागणी केली जात आहे. अन्यथा आंदोलन करू असा इशारा दिला आहे. वारंवार लक्ष देऊन देखील प्रश्न सुटत नाही त्यामुळे नागरिक उद्विग्न झाले आहेत. केवळ नाल्यांची समस्या नाही तर या भागात कचऱ्याचे ढिग देखील मोठ्या प्रमाणात दिसतात. कचरा दररोज उचलल्या जात नाही.

एकीकडे महापालिकेने घंटा गाड्यांमध्ये कचरा टाकावा, इतरत्र टाकू नये असे बंधन केले आहे. तसेच नागरिकांवर वर्षाकाठी ६०० रुपयांचा भुर्दंड लादला आहे. यावरून महापालिकेच्या सभांमध्ये रणकंदन देखींल होत आहे. परंतु महापालिकेच्या आरोग्य विभागाने शहरातील विविध भागांचा आढावा घेऊन कचरा संकलन नियमित होते की नाही, हे पाहणे आवश्यक आहे.



### नागरी समस्याकडे सातत्याने दुर्लक्ष

कृषी नगर आणि परिसरातील नागरी समस्याकडे सातत्याने दुर्लक्ष असल्याचा आरोप आहे. स्वच्छता, नाल्यांची सफाई वेळीच करावी अशी मागणी आहे. महापालिका आरोग्य विभाग तसेच संबंधितांनी याकडे लक्ष द्यावे अशी मागणी आहे. समस्या वेळीच सुटल्या तर नागरिकांना ओरड करावी लागत नाही, परंतु दुर्दैवाने तशी वेळ येते.

### परिसरातील नागरिक संतप्त

विविध समस्या सोडविण्याचा आग्रह धरला जातो. परंतु त्याकडे लक्ष दिले जात नाही. त्यामुळे नागरिक संताप व्यक्त करीत आहेत. इतकेच नाही तर आंदोलनाची भाषा देखील केली जात आहे. आमच्या संयमाची परीक्षा पाहू नका असे रहिवासी बोलत आहेत.

## ग्रामीण भागात विजेचा लपंडाव, नागरिक त्रस्त

**अकोला :** जिल्ह्याच्या ग्रामीण भागात सध्या विजेचा लपंडाव सुरू आहे. एकीकडे भीषण गर्मी, तापमान ४६ अंशापर्यंत आणि त्यात वीज पुरवठा कधीही खंडित होत आहे. त्यामुळे नागरिक त्रासले आहे. रात्री अपरात्री केव्हाही वीज पुरवठा नसतो. त्यामुळे नागरिक त्रास सहन करीत आहेत. यामध्ये सुसूत्रता यावी अशी मागणी केली जात आहे.

महावितरण यंत्रणेने नागरिकांची या जाचातून मुक्तता करावी अशी मागणी केली जात आहे. कारण त्या शिवाय पर्याय नाही.

महावितरण यंत्रणेला संपर्क साधावा तर अनेक अडचणींचा सामना नागरिकांना करावा लागतो. फोन लागत नाही, तसेच संबंधित कर्मचारी प्रतिसाद देत नसल्यामुळे दाद कोणाकडे मागावी, हा प्रश्न जनतेसमोर उभा ठाकतो. यातून त्वरित मार्ग निघावा अशी ग्रामीण जनतेची अपेक्षा आहे.

## कापूस दहा हजारांच्या पार; सोयाबीनलाही उच्चांकी दर

प्रतिनिधी १४ मे

**अकोट :** अकोट कृषी उत्पन्न बाजार समितीसह खाजगी बाजारात कापूस व सोयाबीनच्या दरात मोठी तेजी पाहायला मिळत आहे. कापसाने दहा हजार रुपयांचा टप्पा पार केला असून बुधवारी कापसाला सर्वाधिक १० हजार २८५ रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. तर सोयाबीनलाही प्रतिक्विंटल ७ हजार १४५ रुपयांचा दर मिळाल्याने शेतमाल बाजारात उत्साहाचे वातावरण आहे.

व्यापारी सूत्रांच्या माहितीनुसार, आंतरराष्ट्रीय बाजारातील तणाव, डॉलरच्या तुलनेत रुपयाची घसरण तसेच निर्यात मागणीत वाढ झाल्याने कापसाच्या दरात वाढ झाली आहे. सध्या रुईला ६५ ते ६७ हजार रुपये प्रतिखंडी दर मिळत असून सरकीचे दरही वाढले आहेत.

दरम्यान, सोयातेलाची वाढती मागणी व मर्यादित आवक यामुळे सोयाबीनच्या दरातही तेजी आली आहे. मात्र, हंगामाच्या सुरुवातीलाच कमी दरात माल विकलेल्या शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. 'भाव वाढले; पण शेतकऱ्यांकडे मालच उरला नाही,' अशी भावना शेतकरी व्यक्त करत आहेत.



जाणकारांच्या मते, कापूस व सोयाबीन बाजारातील तेजी आणखी काही काळ कायम राहण्याची शक्यता असून आगामी काळात दरात आणखी चढ-उतार होऊ शकतात.

## अंगणवाडी मदतनीस यांच्या पदोन्नती त्वरित करा, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा



प्रतिनिधी १४ मे

**अकोला :** जिल्हा कार्यक्रम अधिकारी व बाल विकास प्रकल्प अधिकारी अकोला शहर कार्यालयावर जिल्ह्यातील अंगणवाडी मदतनीस यांनी १२ मे रोजी कामगार नेते नयन गायकवाड, सुनंदा पद्मने यांच्या नेतृत्वात व कॉम्रेड रमेश गायकवाड, सुनीता पाटील, सुरेखा ठोसर यांच्या मार्गदर्शन खाली धडकल्या. अंगणवाडी मदतनीस यांना पदोन्नती न दिल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल म्हणून निवेदन जिल्हा कार्यक्रम अधिकारी, महिला व बाल विकास विभाग जि.प. अकोला., यांच्या मार्फत बालविकास प्रकल्प अधिकारी, अकोट, तेल्हारा, बाळापुर, बार्शीटाकळी, पातुर, मुर्तिजापुर, अकोला ग्रामीण, अकोला शहर नागरी, अकोला वाशिम नागरी, बालविकास प्रकल्प अधिकारी यांना देण्यात आले. त्वरित ज्येष्ठता यादी जाहिर करुन अंगणवाडी मदतनीस यांची पदोन्नती करण्यात यावी अशी मागणी केली. अंगनवाडी मदतनिसांचे प्रश्न सुटत नसल्याने संताप व्यक्त होत आहेत.

## बेलखेड शेतशिवारात वृद्ध शेतकऱ्याची आत्महत्या

**हिवरखेड :** पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या बेलखेड शेतशिवारात वयोवृद्ध शेतक-याने आत्महत्या केली. हिवरखेड तेल्हारा रोडवरील बेलखेड शेतशिवारात झाडावर गळफास लाऊन आत्महत्या केल्याचे दिसून आले.

घटनास्थळी नागरिकांचा जमाव झाला होता. आत्महत्याचे नेमके कारण समजले नाही. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला. आणि मृतदेह उत्तरीय तपासणी साठी पाठवला. गेल्या काही दिवसात या भागातील शेतकऱ्यांनी अशा प्रकारे जीवन संपवलेले दिसते.

## शेतकऱ्यांसाठी उद्या ट्रॅक्टर-बैलगाड्यांसह राष्ट्रीय महामार्ग ठप्प करणार

प्रतिनिधी १४ मे

**मूर्तिजापूर :** अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यात पीक विमा व अतिवृष्टी नुकसानभरपाईच्या प्रश्नावर शेतकऱ्यांचा संताप आता टोकाला पोहोचला असून, भारतीय किसान संघाच्या नेतृत्वाखाली १५ मे रोजी ट्रॅक्टर-ट्रॉली, बैलगाड्या आणि शेकडो शेतकऱ्यांसह राष्ट्रीय महामार्ग रोखण्याचा धडक इशारा प्रशासनाला देण्यात आला आहे. शासनाच्या घोषणा केवळ कागदावर राहिल्या, तर शेतकरी मात्र कर्ज, नुकसान आणि अन्यायाच्या खाईत ढकलला गेल्याचा संतप्त आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

भारतीय किसान संघाचे प्रांत उपाध्यक्ष राहुल राठी व आनंद बांगड यांच्या नेतृत्वात बहुसंख्य शेतकरी आणि संघटना आक्रमक भूमिकेत एकत्र आल्या. उपविभागीय अधिकारी संदीप कुमार अपार व तहसीलदार शिल्पा बोबळे यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले. तसेच शहर पोलीस स्टेशनच्या ठाणेदारांनाही माहितीस्तव निवेदन सादर करण्यात आले. तालुक्यातील सातही मंडळांतील शेतकरी प्रचंड आक्रोशात असून, 'समित्या आदेश देतात, पण विमा कंपन्या शेतकऱ्यांना थेट नाकारतात.

अधिकारी आणि कंपन्यांच्या संगनमतामुळे शेतकरी उध्वस्त झाला,' असा गंभीर आरोप करण्यात आला. 'मागण्या पूर्ण होईपर्यंत रास्ता रोको मागे घेतला जाणार नाही. आता शेतकरी शांत बसणार नाही,' असा इशारा देण्यात आला.



## चीचपणी व धारूळ धरणातील गाळ उपसा लवकरच सुरू

### ◆ शेतकऱ्यांना सुपीक गाळाचा लाभ ◆

**अकोट :** जलसंधारण उप विभाग अकोट यांच्या वतीने चीचपणी व धारूळ धरणातील गाळ उपसण्याच्या कामाला येत्या काही दिवसांत प्रारंभ करण्यात येणार असून परिसरातील शेतकरी बांधवांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

धरणातील गाळ हा सुपीक व शेतीसाठी उपयुक्त मानला जात असल्याने अनेक शेतकरी आपल्या शेतजमिनीत हा गाळ टाकण्यास उत्सुक असतात. गाळामुळे जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होते, पाण्याचा धरून ठेवण्याचा गुणधर्म सुधारतो तसेच पिकांच्या उत्पादनक्षमतेत वाढ होण्यास सहाय्य मिळते. त्यामुळे धरणातील गाळ उपसा मोहीम शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

जलसंधारण विभागाच्या माहितीनुसार, ज्या शेतकऱ्यांना आपल्या शेतामध्ये गाळाची आवश्यकता आहे त्यांनी संबंधित संस्था अथवा गावचे सरपंच यांच्याशी तातडीने संपर्क साधावा. वेळेत नोंदणी करून आवश्यक प्रक्रिया पूर्ण केल्यास शेतकऱ्यांना गाळ उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

धरणातील साचलेला गाळ काढल्याने धरणाची पाणी साठवण क्षमता वाढण्यास मदत होणार असून दुसरीकडे शेतकऱ्यांनाही सुपीक मातीचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे हा उपक्रम पर्यावरणीय व कृषी दृष्टीने महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

जलसंधारण उप विभाग अकोट यांनी परिसरातील अधिकाधिक शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेऊन आपल्या शेतीची उत्पादकता वाढवावी, असे आवाहन केले आहे.

## उमरा गावात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबिर संपन्न

प्रतिनिधी १४ मे

**अकोट :** उमरा महसूल मंडळात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन ८ मे रोजी लोकमान्य विद्यालय उमरा येथील क्रिडा मैदानात पार पडले.

मंडळातील नागरिक, शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी आणि महिलांच्या सोयीसाठी महसूल विभागातील महत्त्वाच्या १५ सेवांचा लाभ एकाच छताखाली आणि एकाच दिवशी मिळवून देणे, हा या विशेष अभियानाचा मुख्य उद्देश होता समाधान शिबिरात भूमी अभिलेख ,आरोग्य विभाग, महावितरण विभाग, पशुसंवर्धन विभाग, बालकल्याण विभाग, पंचायत समिती विभाग, कृषी विभाग इत्यादी विभागातील बहुतांश अधिकारी कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते उद्घाटन उप.वि.अ. मनोज लोणारकर यांच्या हस्ते झाले त्या नंतर लाभार्थ्यांना दाखल्यांचे वाटप करण्यात आले आदी विभागांकडून नागरिकांच्या विविध समस्यांचे निराकरण एकाच छताखाली करण्यात आहे सोबतच या शिबिरामध्ये संबंधित सेवांसाठीचे नवीन अर्ज देखील स्वीकारले गेले ज्यामुळे नागरिकांची सरकारी दप्तरातील खटाटोप वाचली उमरा मंडळांतर्गत येणाऱ्या गावांतील नागरिक आणि विद्यार्थ्यांनी आवश्यक या समाधान शिबिराचा उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शवला वयोरुद्धांनी असे शिबिर दर ३ महिन्यातून आयोजित जर करण्यात आले तर सरकारी दप्तरात असलेला कामाचा व्याप व लाभार्थ्यांना होणारा विलंब नक्कीच कायमचा सुटू शकतो असे मत प्रतिपादन केले सदर व्याप्त शिबिराच्या आयोजनासाठी उमरा म.मं. अ. भूपेंद्र चौबे ग्रा.म. अ. संजय तायडे, प्रमोद लांडगे, अस्मिता अवारे ग्रा. गोपाल झामरे यांनी परिश्रम घेतले,



## जनगणना प्रक्रियेत पारदर्शकता आणा

### सम्राट युवा शक्ती संघटनेची मागणी

**अकोट :** आगामी जनगणना प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणण्यासाठी कुटुंब प्रमुखांनी दिलेल्या माहितीची प्रत अथवा पीडीएफ संबंधित कुटुंबाला उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी सम्राट युवा शक्ती संघटनेच्या वतीने करण्यात आली.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, जनगणनेत संकलित केलेली माहिती प्रगणक, पर्यवेक्षक, क्षेत्रीय अधिकारी, तालुका जनगणना अधिकारी, जिल्हा जनगणना अधिकारी अशा विविध स्तरांवर पाठविली जाणार असून प्रत्येक स्तरावर माहितीमध्ये बदल करण्याची सुविधा उपलब्ध असल्याने कुटुंब प्रमुखांनी दिलेल्या मूळ माहितीमध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रगणकाने नोंदविलेल्या माहितीची प्रत तत्काळ संबंधित कुटुंब प्रमुखाला देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच जिल्हास्तर, राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरावर अंतिम करण्यात आलेली माहितीही संबंधित कुटुंब प्रमुखाला उपलब्ध करून देण्यात यावी. माहिती इतरांसाठी गोपनीय असली तरी स्वतःच्या कुटुंबाची माहिती संबंधित कुटुंब प्रमुखाला मिळणे हा अधिकार असल्याचे संघटनेने निवेदनात म्हटले आहे.



### निधन वार्ता

**पुरुषोत्तम गोपाळराव बोरोडे**

**अकोट :** सातेगाव येथील पुरुषोत्तम गोपाळराव बोरोडे, ६९, यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पक्षात पत्नी व तीन मुली व मोठा आप्तपरिवार आहे.

CLASSIFIED

**पाहिजे**

पार्ट टाईम अँड फुल टाईम जॉब करीता मुले पाहिजेत...!

१) मार्केटिंगसाठी ३ मुले (२ व्हिलर, आणि मोबाईल आवश्यक) वेळ ९ ते ५

२) माल पोहचवायला २ मुले

-:संपर्क:-

**आदिराज इंटरप्रासेस**

प्लॉट नं. ५०७
नमुना गल्ली नं. ४
राजकमल चौक, अमरावती
मो. 7028286766

## बसस्थानक परिसरातील जुने चिंचेचे झाड कोसळले



प्रतिनिधी १४ मे

**हिवरखेड :** बसस्थानक आणि केवल देशमुख यांच्या धुऱ्यावर असलेले शंभर ते दोनशे वर्ष जुने चिंचेच्या महाकाय वृक्षाचा अर्धा भाग कोसळला. कोणतेही वारा वादळ अथवा अवकाळी पाऊस नसताना सदर झाड आतून पोकळ झाले असल्यामुळे कोसळल्याची माहिती नागरिकांनी दिली.

सदर झाड कोसळल्याच्या वेळी त्या झाडाच्या सावली खाली अनेक प्रवासी व नागरिक बसलेले होते. परंतु दैव बलवत्तर म्हणून त्यांना झाड कोसळण्याचा अंदाज आल्याने त्यांनी क्षणाचाही विलंब न करता तेथून बाजूला पळाल्याने मोठा अनर्थ टळला आणि त्यांचा जीव वाचला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवित हानी झाली नसली तरी सदर बस स्थानकालगत अनेक छोटी छोटी दुकाने लावून अनेक बेरोजगार युवक आपला उदरनिर्वाह चालवितात. सदर झाडाचा काही भाग त्यांच्या दुकानांवर पडल्यामुळे त्यांच्या दुकानांचे अतोनात नुकसान झाले आहे. एका दुकानातील फ्रिज सुद्धा नुकसानग्रस्त झाला आहे. सदर दुकानदारांनी बोलताना शासनाने, महसूल विभागाने, एस टी महामंडळाने, नगरपरिषदेने तसेच संबंधित सर्व यंत्रणांनी मिळून तात्काळ मदत करावी अशी विनंती केली आहे.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६

**माँ. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय गायत्री नगर, अकोला**

आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर,
प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!

वैशिष्ट्ये :
1) अनुभवी शिक्षकवृंद
2) सुसज्ज पायाभूत ईमारत
3) दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
4) सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
5) आनंददायी शिक्षण पध्दती
6) CCTV ची सुविधा
7) कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
8) सुसज्ज प्रयोगशाळा

इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
1) इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
2) इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
3) शालेय पोषण आहार



माँ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. 9921186715, 9511254959, 9421895790, 9960437366

# सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

गुरुवार, दि. १४ मे २०२६ https://epaper.citynewssuperfast.com


# चार ज्वेलर्सवर सावकारी पथकाची धाड

## आक्षेपार्ह दस्तऐवज / सौदेपत्र, खरेदीखत व इतर कागदपत्रे जप्त

प्रतिनिधी १४ मे



**यवतमाळ :** अवैध सावकारीच्या तक्रारीनंतर यवतमाळ तालुकास्तरीय प्रशासकीय समन्वय समितीच्या आदेशानुसार बुधवारी शहरातील पलक ज्वेलर्स, विनायक ज्वेलर्स, राठी ज्वेलर्स आणि वेदधारिणी ज्वेलर्स या चार आस्थापनांवर सावकारी पथकाने झडती कारवाई केली. या कारवाईदरम्यान आक्षेपार्ह दस्तऐवज, सौदेपत्र, खरेदीखत तसेच इतर महत्त्वाची कागदपत्रे जप्त करण्यात आली.

महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ च्या कलम १६ अंतर्गत शुभांगी राहुल गुल्हाने यांनी ११ मे २०२६ रोजी अवैध सावकारीबाबत तक्रार अर्ज दाखल केला होता. त्यानंतर सहाय्यक निबंधक तथा सहकारी संस्था, यवतमाळ यांच्या आदेशानुसार सावकारी पथकाने संबंधित दुकानांची पडताळणी केली. तपासात संबंधित चार आस्थापनांपैकी दोन परवानाधारक सावकार असल्याचे, तर दोन विनापरवानाधारक सावकारी करत असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले.जप्त करण्यात आलेल्या दस्तऐवजांची पडताळणी करून महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ मधील तरतुदीनुसार पुढील कारवाई प्रस्तावित करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. ही कारवाई सावकारांचे सहाय्यक निबंधक तथा सहाय्यक निबंधक रिता बाळकृष्ण निनावे यांच्या नियोजनाखाली करण्यात आली. पथक क्रमांक १ चे प्रमुख सहाय्यक निबंधक घाटंजी कैलाश खटारे, पथक क्रमांक २ चे प्रमुख सहाय्यक निबंधक दारव्हा व्ही. के. हिरूळकर, पथक क्रमांक ३ च्या प्रमुख सहाय्यक निबंधक यवतमाळ रिता निनावे, तर पथक क्रमांक ४ चे प्रमुख सहाय्यक निबंधक आर्णी प्रकाश झळके यांनी कारवाईत सहभाग घेतला. याशिवाय ग्राम वसूल अधिकारी, मंडळ अधिकारी तसेच पोलीस प्रशासनातील कर्मचाऱ्यांचाही कारवाईत सहभाग होता.संपूर्ण कारवाई जिल्हाधिकारी तथा जिल्हास्तरीय प्रशासकीय समितीचे अध्यक्ष विकास मीना, जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता, जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण, तहसीलदार डॉ. योगेश देशमुख, पोलीस निरीक्षक सुनील नाईक तथा तालुकास्तरीय प्रशासकीय समिती यांच्या मार्गदर्शनाखाली सहकार विभाग, महसूल विभाग आणि पोलीस प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पार पाडली.

# भूदान शेतातून मुरूम उत्खन ; वाहतूक पास तपासणार कोण ?

प्रतिनिधी १४ मे



**कळंब :** मेटीखेडा -राळेगाव मार्गावरील सिमेंट काँक्रीट रस्त्याचे काम सुरू असताना भूदान शेतीतून मोठ्या प्रमाणात मुरूम उत्खनन होत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या उत्खननासाठी आवश्यक वाहतूक पास आणि महसूल परवानग्यांबाबत प्रश्न उपस्थित होत असून परिसरातील नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

रस्ते कामासाठी गौण खनिज म्हणून मुरमाची मोठ्या प्रमाणावर गरज भासत आहे. मात्र परिसरात अधिकृतरित्या मुरूम उपलब्ध नसल्याने संबंधित ठेकेदार कंपनीकडून भोळ्या आदिवासी शेतकऱ्यांची दिशाभूल करून त्यांच्या भूदान जमिनीतून मुरूम खरेदी केला जात असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. डोंगरखड्डा परिसरातील गट क्रमांक २८१ आणि २८२ मध्ये सध्या राजरोसपणे उत्खनन सुरू असल्याचे सांगितले जात आहे. संबंधित शेतकऱ्यांना एका वाहनामागे केवळ अडीचशे रुपये दिले जात असून वाहनांमध्ये सात ते आठ ब्रास मुरूम वाहून नेला जात असल्याचा दावा करण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक होत असल्याची चर्चा आहे. महसूल विभागाच्या नियमांनुसार भूदान अंतर्गत मिळालेल्या जमिनीतील गौण खनिजाची विक्री करता येत नाही. अशा जमिनी उपजीविकेसाठी शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या असतात. मात्र संबंधित कंपनी शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

# दुय्यम निबंधकांविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण

प्रतिनिधी १४ मे

**पुसद :** येथील सह दुय्यम निबंधक श्रेणी-१ कार्यालयातील कथित अनियमिततेप्रकरणी दुय्यम निबंधक श्रीमती विद्या तळेगावकर यांच्याविरोधात सामाजिक कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे बेमुदत उपोषण सुरू केले आहे. भूखंड खरेदी-विक्री व्यवहार उपविभागीय अधिकाऱ्यांच्या परवानगीविना झाल्याचा आरोप करत संबंधितांवर कारवाईची मागणी करण्यात येत आहे.

तक्रारदारांनी या संदर्भात उपविभागीय अधिकारी, पुसद यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. त्यानंतर २ फेब्रुवारी २०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली. तसेच सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी बाळासाहेब घोंगडे यांनीही तक्रारकर्त्यांची बाजू ऐकून घेतल्याचे सांगितले जाते.तक्रारकर्त्यांनी संबंधित खरेदी-विक्री दस्तऐवजांच्या प्रती पुराव्यासह सादर केल्या असून उपविभागीय अधिकाऱ्यांनीही या प्रकरणात कारवाई करण्याबाबत पत्रव्यवहार केल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात आल्याचे उपोषणकर्त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, १२ मेपासून जिल्हाधिकारीकार्यालयासमोर सकाळी ११ वाजता बेमुदत उपोषण सुरू करण्यात आले असून प्रशासन या प्रकरणात काय भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**कार्यालयातील व्यवहारांवर गंभीर आरोप**

पुसद येथील दुय्यम निबंधक कार्यालयात अनेक वर्षांपासून केवळ तीन कर्मचारी कार्यरत असून इतर कामांसाठी खासगी व्यक्तींची नियुक्ती करण्यात आल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. काही प्रकरणांत मृत व्यक्तींच्या नावावर बनावट



खरेदी-विक्री व्यवहार झाल्याचा दावा करण्यात येत आहे. तसेच तुकडाबंदी कायद्यानुसार आवश्यक आदेशांशिवाय व्यवहार नोंदविणे आणि आदिवासी जमिनींच्या कथित बोगस खरेदी-विक्रीकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याचा आरोपही करण्यात येत आहे.

# शिक्षणाच्या नावाखाली पालकांची पिळवणूक ?



प्रतिनिधी १४ मे

**उमरखेड :** तालुक्यातील खासगी शाळा आणि महाविद्यालयांकडून विविध शुल्कांच्या नावाखाली पालकांची आर्थिक लूट सुरू असल्याचा आरोप करत सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रशासनाकडे कठोर कारवाईची मागणी केली आहे. प्रवेश फी, विकास निधी, उपक्रम शुल्क, इमारत निधी आणि परीक्षा शुल्काच्या नावाखाली विद्यार्थ्यांकडून मोठ्या प्रमाणात वसुली होत असल्याने पालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

**उमरखेडमध्ये खासगी संस्थांविरोधात संताप**

या संदर्भात उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसीलदार तसेच गटशिक्षण अधिकारी, उमरखेड यांना निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनावर संजय वाघमारे, प्रवीण इंगळे, मोहम्मद शेख आणि स्वरांजली वाघमारे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदनात म्हटले आहे की, शासनाकडून विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक सवलती आणि योजनांची तरतूद असतानाही अनेक खासगी संस्था नियमबाह्य शुल्क आकारून पालकांना आर्थिकदृष्ट्या वेठीस धरत आहेत. त्यामुळे गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना मुलांचे शिक्षण परवडेनासे झाले असून काही विद्यार्थ्यांवर शिक्षण सोडण्याची वेळ येत आहे.


"शिक्षण हे समाज घडविण्याचे माध्यम आहे की पैसा कमावण्याचा व्यवसाय?" असा सवाल उपस्थित करत सामाजिक कार्यकर्त्यांनी शिक्षण क्षेत्रात वाढलेल्या व्यापारीकरणावर टीका केली. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांवर कठोर कारवाई करून बेकायदेशीर शुल्क आकारणाऱ्या संस्थांची मान्यता रद्द करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच तालुक्यातील सर्व खासगी शाळा आणि महाविद्यालयांची विशेष चौकशी करून शुल्काचा संपूर्ण लेखाजोखा तपासावा, स्वतंत्र चौकशी समिती नेमावी आणि दोषींवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

# आर्णी बाजार समितीकडून पंचनामे, शेतकऱ्यांना मोबदल्याचा दावा

प्रतिनिधी १४ मे

**आर्णी:** आर्णी कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आवारात ५ मे रोजी दुपारी झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचा गहू भिजून नुकसान झाल्याची घटना समोर आली. या प्रकरणाची गंभीर दखल घेत बाजार समितीने नुकसानग्रस्त शेतमालाचे पंचनामे केले असून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी संरक्षणात्मक उपाययोजना करण्यास सुरुवात केल्याची माहिती समितीचे सचिव विशाल राठोड यांनी दिली.

कामगार उपायुक्त राजेश आडे यांच्या पत्राला उत्तर देताना समितीने स्पष्ट केले की, पावसामुळे भिजलेल्या गव्हाचा लिलाव ६ मे रोजी पूर्ण करण्यात आला असून संबंधित शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्यात आला आहे. याबाबत कोणत्याही शेतकऱ्याची तक्रार प्राप्त नसल्याचा दावाही समितीने केला आहे.




बाजार आवारात शेड व्यवस्था, पावसापासून शेतमालाचे संरक्षण आणि अन्य आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यवाही सुरू असल्याचे समितीकडून सांगण्यात आले. शेतकऱ्यांच्या हितासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना प्राधान्याने करण्यात येतील, असेही

# पीक विम्यावरून आरोप-प्रत्यारोप ; वस्तुस्थिती समोर आणण्याची मागणी

प्रतिनिधी १४ मे

**आर्णी :** जिल्ह्यातील प्रधानमंत्री पीक विमा योजनेवरून सुरू झालेल्या वादात केवळ पालकमंत्री ना. संजय राठोड यांच्यावर जबाबदारी ढकलणे योग्य नसून संपूर्ण प्रक्रियेतील त्रुटींची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी शिवसेना प्रणित कृषी सेनेचे समन्वयक प्रमोद कुदळे यांनी केली आहे.

जिल्ह्यात यंदा सरासरीपेक्षा ३० ते ४० टक्के अधिक पाऊस झाला. ११० महसूल मंडळांपैकी १०८ मंडळांत अतिवृष्टीची नोंद झाली असून सोयाबीन, कापूस आणि तूर पिकांचे मोठे नुकसान झाले. अनेक मंडळांची आणेवारी ५० पेक्षा कमी असतानाही एकही महसूल मंडळ पीक विम्यास पात्र ठरले नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. विशेष म्हणजे लगतच्या नांदेड, अमरावती, वर्धा, वाशीम आणि चंद्रपूर जिल्ह्यांना विमा लाभ मिळाला असताना यवतमाळ वंचित राहिल्याने प्रश्न निर्माण झाले आहेत. कुदळे यांनी म्हटले की, पीक विमा प्रक्रिया ही कृषी विभाग, महसूल विभाग, ग्रामविकास यंत्रणा, विमा कंपनी आणि तांत्रिक प्रणालीशी संबंधित बहुविभागीय प्रक्रिया आहे. Crop Cutting Experiment (CCE) मध्ये कृषी विभागाची थेट भूमिका असून उत्पादन आकडेवारी व नोंदींची अचूकता महत्त्वाची असते. प्रत्यक्ष नुकसान मोठे असताना कागदोपत्री उत्पादन जास्त दाखवले गेले असल्यास त्याची जबाबदारी संबंधित यंत्रणांवर येते, असे त्यांनी स्पष्ट केले. सॅटेलाईट प्रतिमांवर आधारित उत्पादन मोजणीवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. अनेक ठिकाणी पिके हिरवी दिसत असली तरी उत्पादन झाले नव्हते, असे त्यांनी नमूद केले. त्यामुळे प्रत्यक्ष शेतस्तरीय पाहणी अनिवार्य करावी, पीक कापणी प्रयोगांची संख्या वाढवावी आणि यवतमाळ जिल्ह्यातील नुकसानीचे विशेष पुनर्मूल्यांकन करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, पालकमंत्री संजय राठोड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सर्वपक्षीय बैठकीची मागणी केली आहे.

# जागतिक कविता महोत्सवाच्या इंडिया चॅप्टरच्या संचालकपदी प्रा. ख़ान हसनैन आकिब

प्रतिनिधी १४ मे

**पुसद :** तिसऱ्या 'सबझमनिश' जागतिक कविता महोत्सवाच्या २०२६ हंगामासाठी भारतातील साहित्यिक क्षेत्राला मोठा सन्मान मिळाला असून प्रसिद्ध कवी, लेखक, अनुवादक आणि शिक्षणतज्ज्ञ प्रा. ख़ान हसनैन आक़िब यांची 'इंडिया चॅप्टर'च्या संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

सबझमनिश जागतिक साहित्य फाउंडेशन तर्फे आयोजित या जागतिक कविता महोत्सवात अफगाणिस्तान, इराण, ताजिकिस्तान, उझबेकिस्तान, अमेरिका आणि भारतातील साहित्यिक व्यक्तिमत्त्वांचा सहभाग आहे. फाउंडेशन सध्या ३३ देशांमध्ये कार्यरत असून जागतिक साहित्यिक देवाणघेवाण वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवत आहे.



महोत्सवाचे सचिव डॉ. बिस्मिल्ला शरीफी यांच्या नेतृत्वाखाली नव्या 'एक्झिक्युटिव्ह बोर्ड'ची स्थापना करण्यात आली आहे. प्रा. आक़िब हे 'डायरेक्टर ऑफ इंडियन अफेअर्स' म्हणून भारतातील साहित्यिक सहभागाचे समन्वयन करतील. भारतीय साहित्यिक समुदाय, जागतिक फाउंडेशन यांच्यात वैचारिक पूल उभारण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. या बोर्डात उस्ताद झाना कुर्दिस्तानी (जनसंपर्क), रोझिता डोगलाविनेजाद (सोशल मीडिया), डॉ. मेहदी बिरानवंद 'रोझमान' (मीडिया समन्वय), शबाना नुझहत (लॉजिस्टिक व वित्त) आणि मोहम्मद रझा शबानकारा (नियोजन) यांचा समावेश आहे. तसेच अमेरिका, अफगाणिस्तान, ताजिकिस्तान आणि उझबेकिस्तानमधील साहित्यिकांनाही विविध जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. दरम्यान, पुढील आठवड्यात स्वीडन, इराण, अफगाणिस्तान आणि ताजिकिस्तानमधील परीक्षकांचा समावेश असलेल्या आंतरराष्ट्रीय ज्युरीची घोषणा केली जाणार आहे. अंतिम विजेत्यांची घोषणा २०२६ अखेरीस होणार आहे अधिक माहितीसाठी Sabzmanesh World Foundation येथे भेट देता येईल।

# डोंगर खर्डा पेट्रोल पंपावर सुविधांचा अभाव ; नागरिकांची गैरसोय वाढली

प्रतिनिधी १४ मे

**कळंब :** तालुक्यातील डोंगर खर्डा येथील पेट्रोल पंपावर मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. इंडियन ऑइल कॉर्पोरेशनकडून ठरवून दिलेल्या सुविधा असूनही त्या प्रत्यक्षात उपलब्ध नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने जनरेटर उपलब्ध असूनही तो कार्यान्वित केला जात नसल्याची तक्रार आहे. त्यामुळे वाहनधारकांना खाजगी ठिकाणांवर अधिक दराने इंधन खरेदी करावे लागत असल्याचे नागरिकांचे म्हणणे




आहे.

पंपावर तक्रार नोंदवही उपलब्ध नसणे, हवा तपासणी मशीनचा अभाव तसेच इंधनाच्या गुणवत्ता तपासणीसाठी आवश्यक सुविधा नसल्याचेही नागरिकांनी निदर्शनास आणले आहे. तसेच ग्राहकांनी व्यवस्थापन किंवा अधिकाऱ्यांचा संपर्क क्रमांक मागितला असता तोही उपलब्ध करून दिला जात नसल्याची तक्रार आहे. लग्नसराई आणि परीक्षांच्या काळात ही गैरसोय अधिक वाढत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे. संबंधित विभागाने या प्रकरणाची दखल घेऊन पंपावर आवश्यक सर्व सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी होत आहे.

# उपजिल्हा रुग्णालयात सुविधांचा बोजवारा ; गंभीर रुग्ण थेट नांदेडला रेफर, नागरिक संतप्त

प्रतिनिधी १४ मे

**उमरखेड :** तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयात अत्यावश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध नसल्याने रुग्णांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. किरकोळ उपचार आणि सलाईनपुरतीच सेवा मिळत असल्याने गंभीर रुग्णांना नांदेड, यवतमाळ किंवा नागपूर येथे रेफर केले जात असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. त्यामुळे गरीब आणि ग्रामीण भागातील रुग्णांच्या खिशाला मोठी कात्री लागत असून खासगी रुग्णालयांमध्ये आर्थिक लूट होत असल्याचा आरोप होत आहे.




मुळावा, पोफाळी, कुपटी, विडूळ, सुकळी, चातारी, ब्राम्हणगाव, बिटरगाव, ढाणकी, खरबी, दराटी आणि निंगणूर परिसरातील नागरिकांसाठी उपजिल्हा रुग्णालय हे महत्त्वाचे केंद्र मानले जाते. मात्र येथे आवश्यक डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी आणि उपकरणांची कमतरता असल्याने रुग्णांना अपेक्षित सेवा मिळत नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे. रुग्णालयातील पदभरती प्रक्रिया अद्याप रखडलेली असून अनेक विभाग रिक्त असल्याचे सांगितले जात आहे. उपचारासाठी आलेल्या रुग्णांना योग्य माहिती दिली जात नसल्याची तसेच कर्मचाऱ्यांकडून समाधानकारक वागणूक मिळत नसल्याचीही तक्रार नागरिकांनी केली.बंदीभागातील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्ण मोठा खर्च करून रुग्णालयात पोहोचतात; मात्र आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने त्यांना पुन्हा खासगी रुग्णालयांचा आधार घ्यावा लागत आहे. परिणामी आर्थिक भार वाढत असल्याची खंत रुग्णांनी व्यक्त केली. दरम्यान, जिल्हा शल्य चिकित्सक आणि आरोग्य विभागाने उपजिल्हा रुग्णालयाची तातडीने दखल घेऊन रिक्त पदे भरावीत, मोफत वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून द्याव्यात आणि अनावश्यक रेफरची प्रथा थांबवावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# खरीप नियोजनात बियाणे व खतांची योग्य निवड महत्त्वाची – अशोक वानखेडे

प्रतिनिधी १४ मे

**यवतमाळ :** आगामी खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांनी बियाणे, रासायनिक खते आणि पेरणीचे योग्य नियोजन करणे काळाची गरज असल्याचे मत कृषीमित्र अशोक वानखेडे यांनी व्यक्त केले. मागील वर्षीच्या अतिवृष्टीमुळे कमी झालेले उत्पन्न, कर्जाचा वाढता बोजा, अपूर्ण कर्जमाफी आणि अनेक शेतकरी पीक विम्यापासून वंचित राहिल्याने यंदाचा खरीप हंगाम आर्थिक अडचणींमध्ये सुरू होत असल्याचे त्यांनी सांगितले.

बाजारात बियाणे व खतांचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून शेतकऱ्यांची फसवणूक होण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी जाहिरातींना बळी न पडता कृषी विद्यापीठ व कृषी विभागाच्या शिफारशीनुसारच बियाणे व शेती



निविष्ठांची खरेदी करावी, असे आवाहन त्यांनी केले. विशेषतः सोयाबीन, मूग आणि उडीद पिकांचे घरचे बियाणे उपलब्ध नसल्याने यंदा शेतकऱ्यांना बाजारातून बियाणे खरेदी करावे लागणार आहे. पावसाचे किमान ६० ते ७० मिमी पर्जन्यमान झाल्याशिवाय पेरणीची घाई करू नये, असा सल्लाही त्यांनी दिला.

खाजगी हवामान अंदाजांवर अवलंबून न राहता अधिकृत हवामान विभाग आणि कृषी विद्यापीठाच्या मार्गदर्शनानुसार निर्णय घ्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. बोगस बियाणे व खतांपासून बचावासाठी अधिकृत परवानाधारक कृषी केंद्रातूनच खरेदी करावी. बियाण्यावरील उगवण क्षमता, तारीख व प्लॉट क्रमांक तपासावा तसेच रिकामी पिशवी जपून ठेवावी, असे त्यांनी सांगितले. बीजप्रक्रियेसाठी रायझोबियम, ट्रायकोडर्मा आणि जैविक घटकांचा वापर केल्यास रोग नियंत्रणास मदत होईल, असेही त्यांनी नमूद केले. यावर्षी कमी पर्जन्यमानाचा अंदाज लक्षात घेता कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांना प्राधान्य देण्याचे आवाहन त्यांनी केले. आंतरपीक पद्धतीचा अवलंब, सेंद्रिय खतांचा वापर आणि पीक विमा योजनेचा लाभ घेणे शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरेल, असेही वानखेडे यांनी सांगितले.

# प्रा. अर्चना महेश पाल यांचे निधन

प्रतिनिधी १४ मे



**यवतमाळ :** श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पुसद येथील विद्यार्थीप्रिय व कार्यकर्तृत्ववान प्राध्यापिका प्रा. अर्चना महेश पाल यांचे १३ मे २०२६ रोजी मध्यरात्री नागपूर येथे उपचारादरम्यान दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने शिक्षण, सामाजिक आणि शिव परिवारात शोककळा पसरली आहे. प्रा. पाल यांचे पार्थिव आज अंत्यदर्शनासाठी त्यांच्या पुसद येथील राहत्या घरी आणण्यात येणार असून त्यांच्यावर आज सायंकाळी ४ वाजता पुसद येथील मोक्षधाम येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

सिटी न्यूज अमरावती

गुरुवार, दि. १४ मे २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

# टाकीच्या पाण्यात मृतदेह आढळला

**अमरावती :** पठाण चौकात एका टाकीच्या पाण्यात मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे पठाण चौक परिसरात घबराट पसरली आहे. डॉ. वझीर पटेल यांच्या संस्थेच्या दवाखान्यात घडलेली घटना असून दवाखाना बऱ्याच काळापासून बंद आहे. दवाखान्याच्या वर दोन पाण्याच्या टाक्या आहेत. आज सकाळी एका टाकीतून एक मृतदेह सापडला.ङ परिसरातून दुर्गंधी येत होती, ज्यामुळे हे प्रकरण उघडकीस आले.

नगरसेवक रशीद अली आणि सामाजिक कार्यकर्ते वाहिद खान यांनी पोलिसांसह दवाखान्याचे कुलूप तोडून घटनास्थळाची पाहणी केली. टाकीत सापडलेला मृतदेह पूर्णपणे कुजलेला असल्याने ओळख पटवणे कठीण झाले आहे. नागपुरी गेट पोलीस या प्रकरणाचा तपास करत असून, घटनास्थळी मोठी गर्दी झाली होती.

# अमरावती महानगरपालिकेचा अभिनव उपक्रम: एक हात मदतीचा

## ◆ अवघ्या तीन तासात लागला शोध ◆ तुळजाबाई गवई यांना मिळवून दिले त्यांचे घर

प्रतिनिधी १४ मे




**अमरावती :** १३ मे रोजी सकाळी ९ वाजता संजय गांधी नगर क्र. २ येथून घराबाहेर पडलेल्या तुळजाबाई गवई चालत-चालत प्रशांत नगरच्या बगीच्यापर्यंत पोहोचल्या.

सायंकाळी ७ वाजता सुचिता कारमोरे यांचा कॉल आला की शुभम कॉलनीच्या गेटजवळ एक आजीबाई बसली आहे. पायाला खोलवर जखम असून त्या स्वतःला तुळजाभवानी गवई सांगत आहेत.

लगेच आधार केंद्राच्या टीमने शुभम नगर गाठून विचारपूस केली. आजीबाई फक्त ठसंजय गांधी नगरठ एवढंच सांगत होत्या. सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीने शोध सुरू केला आणि रात्री १०:३० वाजता त्यांच्या घराचा ठावठिकाणा लागला.


तुळजाबाई आपल्या मुलीकडे, काळपांडे यांच्याकडे राहतात. त्या सकाळपासूनच घराबाहेर पडल्या होत्या. मुलगी पद्माताई व त्यांचे पती रात्री १० वाजता फ्रेजरपुरा पोलीस स्टेशनला रिपोर्ट देण्यासाठी निघाले होते, तेवढ्यात आम्ही कॉल करून आजीबाई सुखरूप असल्याची बातमी दिली.

घरी परतल्यावर आजीबाईला पाहून कुटुंबाला खूप आनंद झाला आणि त्यांनी आधार केंद्राच्या टीमचे व अमरावती महानगरपालिकेचे मनापासून आभार मानले.

परिसरातील नागरिकांनीही या तत्पर सेवेबद्दल कौतुक केले. या पवित्र कार्यासाठी कारमोरे सुचिता ज्योती राठोड राजीव बसवनाथे हे नितीन नांदूरकर यांनी परिश्रम घेतले. आधार टीम - वेळेत पोहोचणारा माणुसकीचा हात.

# आरएसएसच्या १०० व्या वर्धापन दिनानिमित्त राठी नगर येथील हनुमान मंदिराच्या प्रसादम हॉलमध्ये भव्य हिंदू संमेलनाचे आयोजन

प्रतिनिधी १४ मे



**अमरावती:** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (आरएसएस) १०० व्या वर्धापन दिनानिमित्त राठी नगर येथील हनुमान मंदिराच्या प्रसादम हॉलमध्ये एका भव्य हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. चंद्रकुमार मधुसूदन जाजोदिया,(लप्पीभैय्या) यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.

एक विशेष आकर्षण म्हणून, उपस्थित भक्तांमध्ये धर्म, संस्कृती आणि राष्ट्रसेवेचा संदेश देण्यासाठी इस्कॉनचे मधुपतिदास महाराज खास पंढरपूरहून आले होते.

या कार्यक्रमात हिंदू समाजातील एकता, संघटन आणि सांस्कृतिक मूल्यांच्या बळकटीकरणावर भर देण्यात आला. लप्पीभैय्या यांच्या टीमने आणि राठी नगरच्या नागरिकांनी या कार्यक्रमाच्या यशात महत्त्वपूर्ण योगदान दिले. या संमेलनात मोठ्या संख्येने भक्त आणि समाजसेवक उपस्थित होते. यावेळी प्रमुख उपस्थितीत अमित शर्मा, राहुल वर्मा, संदीप पाटील, विजय तिवारी, रोहित यादव, अजय चौधरी, नितीन देशमुख, महेश गुप्ता, दीपक जोशी, सुनील ठाकूर, विनोद मिश्रा, सचिन कुलकर्णी, पंकज अग्रवाल, मनोज सिंग, राजेश जाधव, शुक्ल जाधव, शुक्ल जाधव, अशोक चव्हाण, अशोक चव्हाण आदींचा समावेश होता. अभिषेक त्रिपाठी, विकास खंडेलवाल यांच्यासह अनिकेत जोशी, प्रथमेश आढाळ, रोशन गुप्ता, उत्कर्ष लांडे आणि अभि म्हाले. कार्यक्रमातून समाजकल्याण, राष्ट्रसेवा, धार्मिक जागृतीचा संदेश देण्यात आला. सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टीकोनातून हा कार्यक्रम अत्यंत प्रेरणादायी असल्याचे सांगून उपस्थितांनी या कार्यक्रमाचे कौतुक केले.

# राज्यातील ९९ टक्के वीज ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज नाही

प्रतिनिधी १४ मे

**सौरऊर्जा प्रकल्प बसविलेल्या ग्राहकांना १२९ कोटींचा लाभ**

छतावरील सौरऊर्जा प्रकल्प बसविलेले जे ग्राहक अतिरिक्त वीज महावितरणला देतात त्यांना त्याबद्दल लाभ मिळतो. राज्यातील ४ लाख ९० हजार वीजग्राहकांना या प्रकारे गेल्या वर्षभरात १२९ कोटी ५७ लाख रुपयांचा लाभ मिळाला आहे. त्यामध्ये ४ लाख ७२ हजार घरगुती ग्राहकांचा समावेश आहे व त्यांना १२४ कोटी ५५ लाख रुपयांचा लाभ झाला आहे.

**अमरावती :** राज्यातील छतावरील सौरऊर्जा प्रकल्प बसविलेल्या सरसकट सर्व वीज ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज हा अधिभार द्यावा लागणार असल्याचे चित्र काही हितसंबंधी गटांकडून निर्माण केले जात असून ते पूर्णपणे चुकीचे आहे. राज्यामध्ये महावितरणचे एकूण ३ कोटी १७ लाख वीज ग्राहक असून त्यापैकी ४४,२४६ ग्राहकांना म्हणजे एकूण ग्राहकांपैकी एक टक्क्यापेक्षा कमी अर्थात केवळ ०.१४ टक्के वीज ग्राहकांना हा अधिभार लागू झाला आहे, अशी माहिती महावितरणतर्फे देण्यात आली.

ज्या ग्राहकांचा मंजूर भार १० किलोवॅटपेक्षा अधिक आहे व ज्यांनी छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविला आहे त्यांना त्यांनी निर्माण केलेल्या विजेवर ग्रीड सपोर्ट चार्ज लागू करावा, असा आदेश महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिला आहे. त्यानुसार महावितरणने संबंधित वीज ग्राहकांना हा अधिभार लागू केला आहे.

राज्यात महावितरणचे २ कोटी ३७ लाख घरगुती वीज ग्राहक आहेत. त्यापैकी ६ लाख ५७ हजार घरगुती वीज ग्राहकांनी छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविले आहेत. आयोगाच्या आदेशानुसार सौरऊर्जा प्रकल्प बसविलेल्या एकूण घरगुती ग्राहकांपैकी १६,४१० म्हणजे केवळ २.४९ टक्के घरगुती ग्राहकांनाच ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झाला आहे. सर्व २ कोटी ३७ लाख ग्राहकांशी तुलना केली तर ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झालेल्या घरगुती ग्राहकांचे प्रमाण केवळ ०.०७ टक्के आहे.

राज्यात एकूण ४ लाख ४५ हजार औद्योगिक (उच्चदाब व लघुदाब) वीज ग्राहक असून त्यापैकी केवळ ८,८९४ ग्राहकांना म्हणजे सुमारे २ टक्के ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झालेला आहे. त्याचप्रमाणे महावितरणच्या एकूण २३ लाख ३० हजार व्यावसायिक वीजग्राहकांपैकी १२,८३२ ग्राहकांना म्हणजे ०.५५ टक्के व्यावसायिक ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झाला आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने २०१९ साली छतावरील सौरऊर्जा निर्मिती करणाऱ्या वीजग्राहकांवर ग्रीड सपोर्ट चार्ज लागू करण्याचा निर्णय दिला होता. त्यावेळी आयोगाने छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्पांची राज्यातील एकूण क्षमता २ हजार मेगावॅट झाल्यावर हा चार्ज लागू करण्याचा आदेश दिला होता. आयोगाने २०२३ मध्ये ही मर्यादा ५ हजार मेगावॅट केली. या वर्षाच्या सुरुवातीला राज्याने ५ हजार मेगावॅटची क्षमता ओलांडल्यानंतर आयोगाने २५ मार्च २०२६ च्या वीजदर आदेशात ग्रीड सपोर्ट चार्ज निश्चित केला.

# वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे आ.रवी राणा यांची शासकिय वैद्यकीय महाविद्यालय जागे संदर्भात बैठक

प्रतिनिधी १४ मे

**अमरावती :** मौजा अलीयाबाद गट क्र.९/१ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी मंजुर जमीन वनविभागाच्या अख्त्यारीत असल्यामुळे ही जमीन त्याच ठिकाणी कायम ठेवुन या जमिनीच्या मोबद्दल्यात म्युचिअल अंडर्स्टॅंडींग म्हणुन पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्याकरीता दिले आदेश - आ.रवि राणा यांच्या प्रयत्नाला यश आले.अमरावती येथे प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या जागेचा प्रश्न अखेर मार्गी लागण्याच्या दिशेने महत्त्वाची पावले उचलण्यात आली आहेत. मौजा अलीयाबाद गट क्रमांक ९/१ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी मंजूर करण्यात आलेली जमीन वनविभागाच्या अखत्यारीत येत असल्याने प्रकल्पासमोर मोठा प्रशासकीय अडथळा निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर आमदार रवि राणा यांनी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांची तातडीची बैठक घेऊन सविस्तर चर्चा केली.

बैठकीदरम्यान आ. रवि राणा यांनी अमरावती शहर व बडनेरा शहराच्या दृष्टीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय किती महत्त्वाचे आहे याची माहिती देत प्रकल्प रखडू नये यासाठी तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली. सदर जागा वनविभागाच्या अखत्यारीत असल्यामुळे बांधकाम प्रक्रियेस अडचणी निर्माण होत होत्या. यावर तोडगा म्हणून मंजूर जमीन त्याच ठिकाणी कायम ठेवून वनविभागाला ङ्कम्युच्युअल अंडरस्टँडिंगङ्ग अंतर्गत पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला.

आ. रवि राणा यांच्या पाठपुराव्याला यश मिळत वनमंत्री गणेश नाईक यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश दिल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या उभारणीचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता निर्माण झाली असून अमरावतीकरांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

अमरावती सारख्या मोठ्या जिल्ह्यात अद्ययावत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारले गेल्यास विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणासाठी मोठी संधी उपलब्ध होणार आहे. त्याचबरोबर जिल्ह्यातील आरोग्य सुविधा अधिक सक्षम होण्यास मदत होणार असून ग्रामीण भागातील रुग्णांनाही मोठा दिलासा मिळणार आहे.

दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नासाठी आ. रवि राणा सातत्याने शासन स्तरावर पाठपुरावा करत होते. वनमंत्र्यांसोबत झालेल्या या बैठकीनंतर आता संबंधित विभागांकडून तातडीने प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण होऊन प्रकल्पाच्या कामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

यावेळी बैठकीला मा.मिलिंद म्हैस्कर अपर मुख्य सचिव वन विभाग, रामाराव साहेब नोडल ऑफिस वन विभाग नागपूर, श्रीमती जयश्री भोज सचिव पर्यावरण विभाग, एन आर प्रवीण मुख्य वन संरक्षण वने, जितेंद्र रामगावकर मंत्रालय उपवनसंरक्षक यांच्यासह आदि उपस्थित होते.

# अमरावती येथील हिंदू राष्ट्र जागृती सभा निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी आई अंबादेवी व आई एकवीरा देवीला साकडे !

प्रतिनिधी १४ मे




**अमरावती:** हिंदूबहुल असलेल्या या देशात हिंदूंना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. घुसखोरी, गोहत्या, धर्मांतर, लव्ह जिहाद, हलाल जिहाद, वक्फ जिहाद अशा समस्या वाढत आहेत. या सर्वांवर 'हिंदु राष्ट्र' हेच उत्तर असून छत्रपती शिवाजी महाराज यांनी आदर्श हिंदवी स्वराज्याची स्थापना केली, त्याचप्रमाणे धर्माधिष्ठित कल्याणकारी 'हिंदु राष्ट्रा'ची स्थापना करण्यासाठी व हिंदू धर्म आणि हिंदू यांच्यावर होणाऱ्या या अनेक आघातांना वाचा फोडण्यासाठी, तसेच हिंदूंच्या व्यापक संघटनासाठी हिंदू जनजागृती समितीच्या वतीने रविवार, ७ जुन या दिवशी सायंकाळी ६.३० वाजता अमरावती येथील दसरा मैदान येथे हिंदु राष्ट्र-जागृती सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेसाठी प्रखर हिंदुत्ववादी भाग्यनगर येथील 'श्रीराम युवा सेने'चे संस्थापक-अध्यक्ष आमदार टी. राजा सिंह, सनातन संस्थेच्या धर्मप्रचारक सद्गुरु स्वाती खाडये, तसेच हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्य संघटक श्री. सुनील घनवट हे मान्यवर उपस्थित हिंदूंना मार्गदर्शन करणार आहेत.

या हिंदु राष्ट्र जागृती सभे' च्या निर्विघ्न यशासाठी अमरावतीचे आराध्य दैवत आई अंबादेवी आणि आई एकवीरा देवीच्या चरणी साकडे घालण्यात आले. सनातन संस्थेचे धर्मप्रचारक संत पू. श्री. अशोक पात्रीकर आणि जिल्ह्यातील साधकांच्या उपस्थितीत देवीची ओटी भरून या धर्मकार्यात येणारे सर्व अडथळे दूर होऊन हिंदू राष्ट्र जागृती सभा यशस्वी होऊ दे अशी यावेळी देवीच्या चरणी प्रार्थना करण्यात आली .

# अभ्यासा इंग्लिश स्कूलचा १०० टक्के निकाल

**अमरावती :** अभ्यासा इंग्लिश स्कूल चा इयत्ता बारावी परीक्षेचा निकाल यंदाही उल्लेखनीय लागला असून शाळेने १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखाली आहे.





विशेष म्हणजजे १०विदयार्थी हे प्रविण्य प्राप्त यादीमध्ये आले आहे हो बाब अधिक उल्लेखनीय आहे विद्यार्थ्यांची सत्यात पूर्ण मेहनत शिक्षकांचे मार्गदर्शन आणि शाळेची गुणवता पूर्ण शिक्षणपद्धती यामुळे हे यश प्राप्त झाल्याचे वयवस्थपणाने सांगितले प्रशिक इंगळे यास ९०.१०ज्ञ् व युगा भोंडे ९०.००ज्ञगुण प्राप्त झाले विदयार्थ्यांनी यश संपादन केलं त्याच विदयार्थ्यांनी आपल्या या यशाचे गमक शाळेतील शिक्षक व पालक यांनी त्यांना कश्या प्रमाणात मार्गदर्शन केलं याबाबत माहिती दिली तसेच शाळेतील शिक्षक व शाळेचे मुख्याध्यापिका कांचनमाला ताई गावन्डे व तसेच जे. डी.पाटील सांगळूदकर स्मृती केंद्र यांचे अध्यक्ष कुलभूषण गावंडे यांनी विदयार्थ्याचे कौतुक केले.

# कला शिबिराचा समारोप

प्रतिनिधी १४ मे




**दर्यापूर :** दर्यापूर नगरीत आपले वेगळेपण जपणाऱ्या म्हणून प्रसिद्ध असलेल्या कला त्या एक आनंददायी शिबिराचा रंगारंग समारोप .१० मे २०२६ रोजी सायंकाळी पार पडला.

२० एप्रिल २०२६ ते १० मे २०२६ या कालावधीत रत्नाबाई राठी हायस्कूल, दर्यापूर च्या भव्य व निसर्गरम्य वातावरणात शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठान पुणे व स्पिरीट स्पोर्ट क्लब दर्यापूर यांच्या सहकार्याने पार पडला शाळा शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठान व स्पिरीट स्पोर्ट क्लब यांच्या वतीने आयोजित या आनंदायी शिबिराचे सलग ३९ वे वर्ष होते.

विविध कला क्रीडा नृत्य प्रकार शिकत असताना. उन्हाळी सुट्टीचा आनंद कुठेही कमी न होऊ देता. आपल्या परिसराची ऐतिहासिक ओळख संविधानात अभिप्रेत असलेली मानवाची मुलभूत कर्तव्य व त्या संदर्भात आपली जबाबदारी पर्यावरणाचे संवर्धन व या बाबत माझे प्रत्यक्ष योगदान दैनंदिनी लेखन अंधश्रद्धा म्हणजे काय ? वैज्ञानिक दृष्टीकोन स्वीकारणे का महत्वाचे आहे.या सारख्या विषयावर शिबिरार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. मानवी मूल्य व मूळ संस्कृती यांचे होत असलेले अवमुल्यन या बाबत त्यांना जागृत करण्याचा प्रयत्न या शिबिराच्या माध्यमातून करण्यात आला. ध्वनी प्रदूषणामुळे मानवी जीवनावर होणारे घातक परीणाम या बाबत जाणीव करून देण्यात आली. शिबिराचे उद्घाटन समारंभ .२० एप्रिल २०२६ रोजी शाळा समिती सदस्यांचे उपस्थितीत श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती चे उपाध्यक्ष ऑड गजाननराव पुंडकर यांचे उपस्थितीत पार पडला. या प्रसंगी प्रा गजानन भारसाकळे यांची विशेष उपस्थिति लाभली. रंगारंग समारोपीय कार्यक्रम डॉ वसंतराव टाले शाळा समिती सदस्य यांच्या उपस्थितीत पार पडला या प्रसंगी सुभाषराव इंगळे शिक्षक तुळसाबाई कावल विद्यालय पातुर हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. शिबीर काळात विद्यार्थ्यांनी शिकलेल्या कलांचे प्रदर्शन उपस्थिता समोर केले. विद्यार्थांनी रेखाटलेली चित्रे व हस्त कलेचे छोटे प्रदर्शन व आजच्या शिक्षण व्यवस्थेने निर्माण केलेली मेरीट स्पर्धा मुळे निर्माण झालेल्या, कौतुबिक टेन्शन यावर भाष्य करणारी लघु नाटिका तर. मार्शल आर्ट विभागाचे विद्यार्थ्यांनी प्रधामिक स्वरूपाचे चित्रथरारक प्रत्येक्षिके सादर केलीत त्याच बरोबर त्यांचे प्रशिक्षकांनी मार्शल आर्ट प्रकारातील साहसी प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांचे डोळ्याचे पारणे फेडले.

# गुणवत्तेची परंपरा कायम राखत पी. आर. पोटे पाटील सीबीएसई बारावीचा निकाल शंभर टक्के

प्रतिनिधी १४ मे



**अमरावती:** पी. आर. पोटे पाटील कनिष्ठ महाविद्यालयाच्या सीबीएसई बारावी फेब्रुवारी/मार्च २०२५-२६ परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला असून महाविद्यालयाने सातत्यपूर्ण गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. यंदाच्या परीक्षेसाठी विद्यालयातून एकूण ८० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. सर्व विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती दिली.

या निकालात तब्बल २७ विद्यार्थ्यांनी ८० ते ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवत गुणवंत यादीत स्थान पटकावले. राजेश्वरी रवींद्र राठोड हिने ९६.४० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. पार्थ सुमित चांडक याने ९५.०० टक्के, अथर्व विजय वानखडे व नवीषा संदीप दानखडे यांनी प्रत्येकी ९३.२० टक्के गुण मिळवले. तसेच प्रसाद मुरलीधर वाडेकर ९२.८०%, मल्हार जीवन डालके ९२.४० %, हिमांशू संजय महल्ले ९१.००%, यश नितीन दातीर ९०.४० % आणि मयंक शैलेश हटवार ९०.२० % गुणांसह यशस्वी ठरले. याशिवाय अनुष्का किशोर पखाण ८९.४० %, सर्वज्ञ नितीन कडू ८९.२० %, हेमांगी नरेंद्र भुजाडे ८८.२०%, आर्यन ज्ञानेश्वर वावरकर ८८.००%, अधिराज हेमंतकुमार डिके ८७.८० %, आयुषी आशिष देशमुख ८७.६०%, ओजस्वी मंगेश राऊल ८६.६०%, अग्रजा महेश साबळे ८६.२०%, गौतमी प्रतापराव अडसड व पृथ्वी निलेश ठाकरे प्रत्येकी ८५.००ज्ञ, आशी मनीष अग्रवाल ८४.८०ज्ञ, साहिल गणेशराव बोकडे ८४.६०%, आर्यमन विजय लेवटे व हर्ष राजेंद्र वारकरी प्रत्येकी ८२.८०%, कृपा रवींद्र घुगे व वेदांत प्रवीण वानखडे प्रत्येकी ८२.६०%, पृथा गजानन धर्माळे ८२.४०% आणि मोहम्मद अबुजर ८०.२० % गुण मिळवत गुणवंत ठरले.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची जिद्द, सातत्यपूर्ण अभ्यास, पालकांचे सहकार्य तसेच शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरल्याची भावना व्यक्त करण्यात आली. नियमित सराव परीक्षा, वैयक्तिक मार्गदर्शन आणि शिस्तबद्ध शैक्षणिक वातावरणामुळे हे यश शक्य झाल्याचे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचेही कौतुक करण्यात आले. पी. आर. पोटे पाटील कनिष्ठ महाविद्यालयाच्या या दैदिप्यमान यशामुळे विद्यार्थी, पालक आणि संपूर्ण अमरावती परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून महाविद्यालयावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# विधानसभा आश्वासन समिती अध्यक्ष आ.रवी राणा यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील विद्युत समस्या व प्रलंबित कामांबाबत आढावा बैठक

प्रतिनिधी १४ मे


**अमरावती :** अध्यक्ष विधानसभा आश्वासन समिती व आमदार रवी राणा यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामीण तसेच शहरी भागातील विद्युत पुरवठा समस्यांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी तसेच मंजूर विकासकामांची सद्यस्थिती व इतर प्रलंबित विषयांवर निर्णय घेण्यासाठी विद्युत भवन मुख्यालय, अमरावती येथे जिल्हास्तरीय आढावा बैठकीचे आज .१४ मे रोजी दुपारी ०१:०० वाजता आयोजन करण्यात आले आहे.

ही बैठक गुरुवार दिनांक १४ मे २०२६ रोजी दुपारी ०१:०० वाजता विद्युत भवन मुख्यालय, अमरावती येथे आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष विधानसभा आश्वासन समिती तथा आमदार रवी राणा यांनी दिली.

सदर बैठकीमध्ये ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध विद्युत पुरवठा समस्यांचा आढावा घेऊन त्यावर आवश्यक ती कार्यवाही व निर्णय घेण्यात येणार आहेत. तसेच मंजूर विकासकामांची प्रगती, अपूर्ण कामे, प्रलंबित विषय व संबंधित अडचणींबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेण्यात येणार आहे.

अमरावती जिल्ह्यातील संबंधित सर्व कार्यकारी अभियंते, विभागीय अधिकारी व उप अभियंते यांनी आवश्यक माहिती व अद्ययावत कागदपत्रांसह बैठकीस उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच बैठकीतील कार्यवाहीचा प्रोसिडिंग तयार करून त्याबाबतचा अहवाल तात्काळ सादर करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत.बैठकीच्या समन्वयासाठी उमेश ढोणे (खाजगी सचिव) यांच्याशी मोबाईल क्रमांक ९०४९०६७३३१वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
गुरूवार दि १४ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com







## रमेश टॉकीज गुप्तधन प्रकरण...

# मास्टर माईंड खास, पोलीस कारवाईत संशयाचा वास !

## मेटल डिटेक्टर पुरविणाऱ्या 'सोनारासह ' साथीदारांवर कारवाईची मागणी




● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम शहरातील बंद पडलेल्या रमेश टॉकीजमध्ये गुप्तधनाच्या शोधासाठी सुरू असलेल्या संशयास्पद खोदकाम प्रकरणात शहर पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने धाड टाकून ७ जणांना ताब्यात घेतले होते. मात्र त्याच रात्री चौकशीनंतर सर्वांना सोडून देण्यात आल्याने या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे या प्रकरणातील कथित मास्टरमाईंड मानल्या जाणाऱ्या माजी आमदाराच्या पी.ए.ला व त्याच्या इतर 'त्रिमूर्ती' साथीदारांवर कोणतीही कारवाई न करता मोकाट सोडल्याची चर्चा रंगू लागली आहे. त्यामुळे हे प्रकरण पोलिसांनी रफादफा केला का ? असा सवाल उपस्थित होत असून शहर पोलीस संशयाच्या भोवऱ्यात अडकले आहेत.आता या संपूर्ण प्रकरणाकडे जिल्हा पोलीस अधीक्षकांनी स्वतः लक्ष देण्याची मागणी केली जात आहे.



वाशीम शहरातील जुन्या व बंद अवस्थेत असलेल्या रमेश टॉकीज परिसरात गेल्या काही दिवसांपासून गुप्तधनाच्या शोधासाठी खोदकाम सुरू असल्याच्या चर्चा सुरू होत्या. या संदर्भात मिळालेल्या गुप्त माहितीनंतर शहर पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने १२ मे रोजी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास अचानक छापा टाकला.या कारवाईदरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरून सात जणांना ताब्यात घेत चौकशीसाठी पोलीस ठाण्यात आणले. तसेच गुप्तधन शोधण्यासाठी वापरण्यात येणारे 'मेटल डिटेक्टर' मशीन आणि खोदकामासाठी लागणारे इतर साहित्यही जप्त करण्यात आले. मात्र रात्री उशिरापर्यंत चौकशी करूनही ताब्यात घेतलेल्या सातही जणांवर कोणतीही कारवाई न करता त्यांना सुखरूप सोडून देण्यात आले. दरम्यान या संपूर्ण प्रकरणामागे काही राजाश्रय असलेल्यांचा सहभाग असल्याची चर्चा शहरात सुरू आहे. प्रकरणातील कथित मास्टरमाईंड हा एका माजी आमदाराचा पी .ए. असून दुसरी व्यक्ती एका मोठ्या राजकीय पक्षाचा माजी शहराध्यक्ष असल्याचे बोलले जात आहे.तसेच या प्रकरणात सहभागी असलेल्या काही मंडळीची थेट मंत्रालयापर्यंत पोहोच असून चौथा व्यक्ती हा शहरातील एक गर्भश्रीमंत सोनार असल्याची माहिती समोर येत आहे.याच सोनाराने गुप्तधन शोधण्यासाठी लागणारे मेटल डिटेक्टर मशीन उपलब्ध करून दिल्याचेही समजते . विशेष म्हणजे घटनास्थळावरून ताब्यात घेतलेल्या सात जणांवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाहीच. शिवाय या प्रकरणातील मास्टरमाईंड आणि त्याच्या साथीदारांवरही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.त्यामुळे शहर पोलिसांच्या कार्यपद्धतीवर अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. वाशीममध्ये उघडकीस आलेल्या या गुप्तधन प्रकरणामुळे जिल्हाभरात मोठी खळबळ उडाली असून विविध चर्चांना उधाण आले आहे.या प्रकरणाची जिल्हा पोलीस अधीक्षकांनी गांभीर्याने दखल घेऊन कथित मास्टरमाईंड, मेटल डिटेक्टर पुरवणारा सोनार आणि त्यांच्या 'अदृश्य' असलेल्या साथीदारांवर कठोर कारवाई करून त्यांना जेरबंद करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे. आता हे प्रकरण पुन्हा रफादफा होणार की, राजकीय पाठबळ असलेल्या संबंधितांचे चेहरे जनतेसमोर येणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात

### मेहनाज पटेल यांचे भाजपाच्या वतीने स्वागत



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

राजस्थान प्रांताच्या भाजपा अल्पसंख्यांक मोर्चा सोशल मीडिया प्रमुख मेहनत पटेल या महाराष्ट्र दौऱ्यावर आले असता मंगरूळपीर येथे भाजपाच्या वतीने त्यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

राजस्थान भाजपाच्या अल्पसंख्यांक मोर्चा सोशल मीडिया प्रमुख तथा सवाई माधोपुर मतदार संघाच्या अल्पसंख्यांक मोर्चाच्या प्रमुख मेहनज पटेल या महाराष्ट्र दौऱ्यावर आले असता त्यांनी मंगरूळपीर येथे सदिच्छा भेट दिली यावेळी त्यांनी भाजपा अल्पसंख्यांक महाराष्ट्रातील विविध योजनांबद्दल व अल्पसंख्यांकांच्या ध्येय धोरणाबद्दल भाजपाचे कार्य व अल्पसंख्याकांचा दर्जा उंचावण्याकरिता भाजपा करीत असलेल्या कार्याचे त्यांनी भरभरून कौतुक केले तसेच येथील भाजपा पदाधिकाऱ्यांसोबत व कार्यकर्त्यांसोबत विविध विषयावर चर्चा केली यावेळी भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मोहम्मद शारीक यांनी त्यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी भाजपाचे किशोर घोडचर, सुनील मालपाणी व्यापारी सेल प्रदेश सदस्य, अ‍ॅड.सुधीर घोडचर भाजपा नगरसेवक, शारीक सौदागर वाशिम जिल्हा अध्यक्ष भाजपा अल्पसंख्यांक मोर्चा,सामाजिक कार्यकर्ता,उमेश शृंगारे भाजपा सदस्य,रोहन सुरोशे एम एल ए यांचे स्वीय सहाय्यक, पत्रकार शरद येवले , विजय भोजने यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

### ग्रीष्मकालीन क्रीडा प्रशिक्षण शिबीराचे आयोजन

**वाशीम :**क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य तसेच जिल्हा क्रीडा परिषद, वाशिम आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा क्रीडा संकुल, वाशिम येथे १५ मे २०२६ ते ३० मे २०२६ या कालावधीत विविध खेळांचे व शिबिराचे आयोजन करण्यात आले.

# महसूल विभागातील गैरप्रकार, प्रमाणित केला बनावट फेरफार !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

**जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात येत असलेल्या शेलुखडसे येथील एका बनावट फेरफारची चर्चा जिल्हाभर गाजत आहे. वारस हक्कदार म्हणून असलेल्या बहिणीचे नाव सात बारावरून काढण्यासाठी खोटा मृत्यूचा दाखला देत चक्क जिवंत व्यक्तीच मयत दाखवून वारसाची नोंद करण्यात आली असल्याचे बोलले जात आहे. या बाबतचे सर्व पुरावे समोर आले असून या बनावट फेरफारमुळे महसूल विभागात खळबळ उडाली आहे. चौकशी दरम्यान सबंधित फेरफार बनावट असल्याचे स्पष्ट झाले तर तहसीलदार काय कारवाई करणार याकडे तालुकवासियांचे लक्ष लागले आहे.**

प्राप्त माहितीनुसार रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथील गावठाण क्षेत्राला लागून असलेल्या तत्कालीन सर्व्हे नंबर १५६/२ मधील हा प्रकार समोर आला आहे. या बाबत अद्याप कुठलीही तक्रार समोर आली नसली तरी हा एक अक्षम्य प्रकार चव्हाट्यावर आल्याने महसूल विभागातील अनागोंदी जिल्हाभर चर्चेचा विषय ठरत आहे. ज्या तलाठ्याने खोटी माहिती सादर केली व तत्कालीन नायब तहसीलदार यांनी तो फेरफार प्रमाणित केला आहे. कदाचित या प्रकरणातील काही कर्मचारी व अधिकारी आजमितीस सेवानिवृत्त देखील झाले असू शकतात. मग या गंभीर प्रकरणात चौकशी होऊन सदर प्रकरण बनावट असल्याचे स्पष्ट झाले तर कारवाई कोणावर व काय होणार याची चर्चा सर्व सामान्य नागरिक करत आहेत. सदर प्रकरण गंभीर स्वरूपाचे असून संविधानिक अधिकाराला सुरुंग लावणारे ठरत आहे. वडिलांच्या संपत्तीतील मुलीच्या अधिकाराला हानी पोहचविणारा आहे.

त्यामुळे अशा गैरप्रकारांना आळा बसविण्यासाठी शासनाने सबंधित दोषींवर कठोर कारवाई करून असे बनावट प्रकार रद्द करावेत अशी मागणी जोर धरत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या गंभीर प्रकाराची त्वरित दखल न घेतल्यास अशा भ्रष्टाचाराची तक्रार जिल्हाधिकारी, महसूल आयुक्त ते थेट मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि महसूल मंत्री यांच्याकडे करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

**महसूल विभागात खळबळ उडवून देणारी माहिती समोर**




### तलाठ्याची भूमिका संशयास्पद...

शेतजमिनीच्या संदर्भातील प्रत्येक व्यवहाराचा प्रमुख दुवा म्हणून तलाठ्याकडे पहिले जाते. त्यामुळे या गंभीर प्रकरणात तत्कालीन तलाठ्याची भूमिका संशयास्पद वाटतं आहे. वारस नोंदीसाठी आवश्यक असलेल्या बाबींची कुठलीही शहानिशा न करता थेट वारस नोंद मंजूर केली असल्याने एका महिलेवर अन्याय करण्यात आला आहे. या गंभीर बाबीकडे राज्याचे महसूलमंत्री नामदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी लक्ष द्यावे अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




## ३०० कोटी वृक्षारोपण अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करा - जिल्हाधिकारी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

३०० कोटी वृक्षारोपण अभियान हे केवळ वृक्ष लागवडीपुरते मर्यादित नसून भविष्यातील पर्यावरण संरक्षण, जलसंधारण आणि हवामान बदलाच्या परिणामांना तोंड देण्यासाठीची व्यापक लोकचळवळ आहे. प्रत्येक विभागाने समन्वयाने काम करून वृक्षारोपणासोबतच त्यांचे दीर्घकालीन जतन व संवर्धन यावर भर द्यावा, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

राज्य शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या ३०० कोटी वृक्षारोपण अभियान २०२६-२०४७ अंतर्गत जिल्हास्तरीय नियोजन, समन्वय व अंमलबजावणीसंदर्भात



आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे- पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, उपवनसंरक्षक अभिजित वायकोस आदींची प्रमुख उपस्थिती होती.बैठकीत अभियानाची उद्दिष्टे, लँड बँक निर्मिती, स्थानिक प्रजातींची निवड, आर्थिक नियोजन, डिजिटल मॉनिटरिंग प्रणाली आणि वृक्ष संवर्धनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. शासन निर्णय दि. ७ मे २०२६ अन्वये राज्यात हरित महाराष्ट्र उभारण्याच्या उद्देशाने सन २०२६ ते २०४७ या कालावधीत व्यापक वृक्षारोपण मोहीम राबविण्यात येणार आहे.जिल्हाधिकारी श्री. कुंभेजकर यांनी सांगितले की, वृक्षारोपण क्षेत्रांचे शंभर टक्के जिओ-टॅगिंग, उपग्रहाधारित पडताळणी आणि डिजिटल एमआरव्ही (श्दहगूदेग्हु, ̄ंज्दूग्हु ̄ह् न्र्ग्ग्ग्ूदह) प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे. पाचव्या वर्षापर्यंत किमान ६० टक्क्यांपेक्षा अधिक जिवंत रोपांचे प्रमाण राखण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून, पुढील दहा वर्षांपर्यंत वृक्षांचे जतन आणि संवर्धन करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे.

# शालेय विद्यार्थ्यांचा वाटोळा हजारो टन तांदळाचा घोटाळा!

## वाशिम जिल्ह्यातील शिक्षण विभाग हादरला; एसआयटी चौकशीची मागणी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

'विद्यार्थ्यांच्या ताटातील घास कोणी लाटला?' असा संतप्त सवाल उपस्थित करत वाशिम जिल्ह्यातील पंतप्रधान पोषण शक्ती निर्माण योजनेत (शालेय पोषण आहार) कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झाल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते विकास देविदास दाभाडे यांनी केला आहे. या संदर्भात अमरावती विभागीय आयुक्तांकडे सादर करण्यात आलेल्या निवेदनामुळे जिल्हा परिषद शिक्षण विभागात एकच खळबळ उडाली आहे. सन २०१८ ते २०२५ या कालावधीत शासकीय व अनुदानित शाळांना पुरविण्यात आलेल्या तांदळामध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, सन २०२० ते २०२४ या चार वर्षांच्या कालावधीत तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशाने गठित चौकशी समितीने तब्बल १५ ते २० दिवस रेकॉर्ड तपासणी केल्याची माहिती समोर आली आहे.

या चौकशीदरम्यान अनेक शाळांच्या मुख्याध्यापकांच्या बनावट सही, डुप्लिकेट शिक्के आणि बनावट पावत्यांचा वापर झाल्याची जोरदार चर्चा जिल्हा परिषद वर्तुळात रंगली होती. संबंधित पुरावे आपल्याकडे उपलब्ध असल्याचा दावा निवेदन कर्त्यांनी केला आहे. या प्रकरणात बीड येथील जगदंबा इंटरप्रायझेस या ठेकेदाराकडून कोट्यवधी रुपयांची पुनर्प्राप्ती करण्यात आल्याचे सांगितले जात असले, तरी आजपर्यंत संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल न झाल्याने संशय अधिकच गडद झाला आहे.'घोटाळा सिद्ध झाला, मग कारवाई का नाही ?' असा थेट सवाल उपस्थित करत संबंधित ठेकेदाराला पुन्हा काम देण्यात आल्यामागे कोणाचा आशीर्वाद आहे, याची सखोल चौकशी करण्याची मागणी




करण्यात आली आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी जिल्हा परिषद कार्यालयातील मीटर रूममध्ये लागलेल्या आगीत महत्त्वाचे दस्तावेज जळून खाक झाल्याने या प्रकरणातील पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न तर नाही ना? अशीही शंका उपस्थित होत आहे. त्यामुळे संबंधित सर्व रेकॉर्ड ऑनलाईन करून त्याच्या प्रती विभागीय आयुक्त कार्यालयात सुरक्षित ठेवाव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.निवेदनात आणखी एक धक्कादायक दावा करण्यात आला असून, प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या तांदळाची आणि प्रत्यक्ष शाळांमध्ये पोहोचलेल्या तांदळाची तुलना केल्यास अंदाजे ५ ते १० हजार टन तांदळाचा अपहार उघड होऊ शकतो, असे म्हटले आहे.या संपूर्ण प्रकरणाचा पाठपुरावा आपण आणि पत्रकार प्रशांत देवानंद तायडे हे सन २०१८ पासून सातत्याने करत असल्याचे विकास दाभाडे यांनी नमूद केले आहे. तत्कालीन सीईओ यांनी सुनावणीची प्रक्रिया सुरू केली होती, मात्र लोकसभा निवडणुकीमुळे कार्यवाही रखडली. त्यानंतर अधिकाऱ्यांच्या बदल्यांमुळे प्रकरण थंडबस्त्यात गेल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची एसआयटी किंवा आर्थिक गुन्हे शाखेमार्फत चौकशी करून दोषींवर शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी जोरदार मागणी आता होत असून, सदर प्रकरण हे अप्पर आयुक्त श्री जाधव यांच्या निदर्शनात बनावटी पावत्यासह आणून देण्यात यश आले आहे त्यामुळे आता या प्रकरणात कुठली ठोस भूमिका विभागीय आयुक्त घेतात याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# दापुरी खुर्द येथे ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षामुळे नागरिक संतप्त !

## ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात; तातडीने लक्ष देण्याची गरज

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

रिसोड तालुक्यातील दापुरी खुर्द गावामध्ये सध्या सर्वत्र अस्वच्छतेचे गंभीर चित्र निर्माण झाले असून ग्रामपंचायतीच्या हलगर्जीपणामुळे गावात घाणीचे साम्राज्य पसरल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. गावातील मुख्य रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, अंतर्गत मार्ग तसेच नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा साचलेला असून नियमित साफसफाई होत नसल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

गावातील अनेक भागांमध्ये सांडपाणी रस्त्यावर वाहत असल्याचे दिसून येत असून तुंबलेल्या नाल्यांमुळे दुर्गंधीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. यामुळे डास, माशा व इतर कीटकांचे प्रमाण वाढले असून लहान मुले, महिला व ज्येष्ठ नागरिकांना विविध आजारांचा धोका निर्माण झाला आहे. विशेषतः पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर गावातील अस्वच्छतेची समस्या अधिक गंभीर बनण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गावात नियमित स्वच्छता मोहीम राबविण्यात येत नसून कचरा व्यवस्थापनाकडेही दुर्लक्ष केले जात आहे. अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग दिवसेंदिवस वाढत असून सार्वजनिक ठिकाणी घाणीमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच काही भागांमध्ये नाल्यांचे पाणी रस्त्यावर येत असल्याने नागरिकांना दुर्गंधी व अस्वच्छ वातावरणात वावरावे लागत आहे.स्थानिक नागरिकांनी वेळोवेळी ग्रामपंचायत प्रशासनाकडे तक्रारी करूनही परिस्थितीत कोणतीही सुधारणा झालेली नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. गावातील स्वच्छता कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या, साफसफाईच्या कामातील अनियमितता तसेच प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे गावाची स्वच्छता व्यवस्था पूर्णपणे कोलमडल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.गावातील सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला असून डेंग्यू, मलेरिया, ताप यांसारख्या साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव होण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. गावातील पिण्याच्या पाण्याच्या परिसरातही अस्वच्छता निर्माण झाल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. दरम्यान, संबंधित प्रशासन व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ दखल घेऊन दापुरी खुर्द गावात विशेष स्वच्छता



मोहीम राबवावी, तुंबलेल्या नाल्यांची साफसफाई करावी, कचरा व्यवस्थापन प्रभावीपणे राबवावे तसेच गावातील स्वच्छता व्यवस्था सुरळीत करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. ग्रामपंचायतीने तातडीने कार्यवाही न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही काही ग्रामस्थांनी दिला असून गावातील वाढत्या अस्वच्छतेमुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा

गुरुवार, दि. १४ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## लोणार - नवापूर बसफेरी सुरू!

**लोणार :** लोणार ते नवापूर मार्गे संभाजीनगर या बसफेरीची अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेली मागणी अखेर पूर्ण झाली असून, प्रा. वसंत मापारी यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही बससेवा सुरू करण्यात आली आहे. या निर्णयामुळे परिसरातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. लोणार सरोवर हे जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ असल्यामुळे या भागात वाहतूक सुविधा वाढविण्याची गरज वारंवार व्यक्त होत होती. प्रवासी सेवा संघटनेकडूनही या बसफेरीची मागणी करण्यात येत होती. ही बाब लक्षात घेऊन प्रा. वसंत मापारी यांनी धुळे विभागाचे नियंत्रक व्यवहारे यांच्याशी संपर्क साधून लोणारच्या पर्यटनाचे महत्त्व पटवून दिले आणि बसफेरी सुरू करण्याची विनंती केली. त्यांच्या या प्रयत्नांना यश मिळत अखेर ही बससेवा सुरू करण्यात आली. लोणार-नवापूर बसफेरी सुरू झाल्यानंतर प्रवासी सेवा संघटना, लोणार यांच्यावतीने प्रा. वसंत मापारी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी संघटनेचे भागवत खरात, अशोक काटकर, तसेच थोरवे उपस्थित होते. त्यांनी प्रा. वसंत मापारी यांच्या कार्याचे कौतुक करत आभार व्यक्त केले.

# लसीकरणातील त्रुटींना लगाम; कृती दलाची स्थापना!

### आवश्यक उपाययोजना राबवण्यावर भर देणार

प्रतिनिधी १४ मे



**खामगाव:** राज्यात बालकांच्या लसीकरण मोहिमेत आढळणाऱ्या त्रुटींना आळा घालण्यासाठी शासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. लसीकरणापासून हजारो बालके वंचित राहात असल्याच्या पार्श्वभूमीवर आता राज्य, जिल्हा आणि महानगरपालिका स्तरावर विशेष 'लसीकरण कृती दल' स्थापन करण्यात येणार आहे. या कृती दलामार्फत लसीकरण मोहिमेचा नियमित आढावा, अंमलबजावणी, निधी वापर, वंचित बालकांचा शोध तसेच आवश्यक उपाययोजना राबविण्यावर भर दिला जाणार आहे.

राज्यात बालमृत्यू रोखण्यासाठी आणि बालकांना विविध संसर्गजन्य आजारांपासून संरक्षण देण्यासाठी सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम राबवला जातो. मात्र, ग्रामीण भागातील अपुरी जनजागृती, स्थलांतरित कुटुंबे, आरोग्य यंत्रणेतील समन्वयाचा अभाव आणि काही ठिकाणी निष्काळजीपणामुळे अनेक बालके लसीकरणापासून वंचित राहात असल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे सरकारने लसीकरण मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी स्वतंत्र कृती दल उभारण्याचा निर्णय घेतला आहे.बालकांच्या जन्मापासून ठराविक वयानुसार दिल्या जाणाऱ्या लसी त्यांना गंभीर संसर्गजन्य आजारांपासून संरक्षण देतात. लसीकरणामुळे बालमृत्यूचे प्रमाण कमी होण्यास मदत होते. वेळेवर लसीकरण झाल्यास बालकांची रोगप्रतिकारशक्ती वाढून आरोग्य अधिक सक्षम राहते.

**निधी वितरण व खर्चाचीही सखोल आढावा**

लसीकरणासाठी उपलब्ध निधीचे वितरण, वापर आणि खर्चाची तपासणी कृती दलाकडून केली जाणार आहे. निधी योग्य पद्धतीने वापरला जाईल, यासाठी नियमित अहवाल आणि परीक्षण व्यवस्था तयार करण्यात येणार आहे.

**आता लसीकरण कृती दल स्थापन**

लसीकरण मोहिमेतील त्रुटी दूर करण्यासाठी शासनाने स्वतंत्र कृती दल स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. हे दल लसीकरण मोहिमेचे नियोजन, अंमलबजावणी, आढावा आणि सुधारणा यावर लक्ष ठेवणार आहे.

# शासनाने घोषणा केल्याप्रमाणे तीन महिन्याचे स्वस्त धान्य वाटप करण्याकरिता मुदत वाढवून द्यावी

### स्वस्त धान्य दुकानदारांची मागणी

प्रतिनिधी १४ मे



**शेगाव :** महाराष्ट्र शासनाने घोषणा केल्याप्रमाणे एप्रिल ते जून २०२६ पर्यंत तीन महिन्याचे धान्य दुकानदारांना द्यावे आणि सदर धान्य लाभार्थींना वाटण्याकरिता मुदत वाढवून देण्यात यावी तसेच जानेवारी ते एप्रिल महिन्यापर्यंत दुकानदारांना मार्जिन रक्कम देण्यात यावी अशा प्रकारची मागणी शेगाव तालुका स्वस्त धान्य दुकानदार संघटनेने जिल्हाधिकारी यांना केली आहे महाराष्ट्र शासनाने घोषणा केल्याप्रमाणे माहे एप्रिल मे जून या तीन महिन्याचे एकत्रित धान्यवाटप करण्यात येणार अशी घोषणा करण्यात आलेली आहे परंतु प्रत्यक्षात मात्र अद्याप पर्यंत स्वस्त धान्य दुकानदारांना फक्त माहे एप्रिल चे धान्य पोहोचलेले आहे परंतु मे आणि जून २०२६ चे धान्य दुकानात पोहोचलेले नाही तर मग स्वस्त धान्य दुकानदारांनी वाटप कसे करावे? लाभार्थी दररोज दुकानात येऊन चकरा मारतात आणि म्हणतात सरकारने तीन महिन्याचे धान्य दिल्यानंतरही तुम्ही आम्हाला का देत नाही? म्हणून वाद घालतात तसेच काही स्वस्त धान्य दुकानदारांनी सुरुवातीला तीन महिन्याचे वाटप केल्यामुळे एप्रिल २०२६ चे वाटप लाभार्थ्यांना होऊ शकलेले नाही आणि त्यामुळेच एप्रिल ते जून महिन्यापर्यंत शासनाने घोषणा केल्याप्रमाणे स्वस्त धान्य दुकानदारांना धान्य पोहोचवावे आणि वाटप करिता दुकानदारांना मुदत वाढवून द्यावी अशा प्रकारची मागणी शेगाव तालुका स्वस्त धान्य दुकानदार संघटनेने जिल्हाधिकारी यांच्याकडे गेलेली आहे तर सुरुवातीला केलेल्या वाटपाचे मार्जिन रक्कम अजून स्वस्त धान्य दुकानदारांना मिळालेली नसल्याने लवकरात लवकर सदर रक्कम मिळवून द्यावी अशी ही मागणी या पत्राद्वारे करण्यात आलेली आहे.या निवेदनावर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या असून, तहसीलदारांमार्फत जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन पाठविण्यात आले आहे.

# खामगाव पालिकेसमोर थाळी बजाओ आंदोलन

### पुतळा नियमानुकूल करण्याची मागणी

प्रतिनिधी १४ मे

**खामगाव:** शहरातील रेल्वे स्टेशनच्या मुख्य प्रवेश द्वारा जवळ उभारण्यात आलेल्या साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्याचे नियमितीकरण व परिसराचे सुशोभीकरण करण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी मातंग समाजातील महिलांनी मंगळवार , दि. १३ मे रोजी नगरपरिषदेसमोर थाळी बजाओ आंदोलन केले. अण्णा भाऊ साठे स्मारक समितीच्या माध्यमातून या मागणीसाठी २५ मार्चपासून नगरपरिषदेसमोर साखळी उपोषण सुरू असून, आंदोलनाचा मंगळवारी ५० वा दिवस पूर्ण झाला. यापूर्वी समाजबांधवांच्या वतीने डफडे बजाओ आंदोलनही केले होते; मात्र अद्यापही नगरपरिषद प्रशासनाने या विषयावर विशेष सभा घेऊन कोणताही ठराव पारित केलेला नसल्याने समाजामध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. या निषेधार्थ मातंग समाजातील महिलांनी नगरपरिषद कार्यालयासमोर थाळी वाजवत घोषणाबाजी केली.

# शिवकालीन शस्त्रास्त्रे, गडकिल्ल्यांचे दोन दिवसीय प्रदर्शन

### शंभूराजे जन्मोत्सवानिमित्त इतिहासाला उजाळा

प्रतिनिधी १४ मे





**मलकापूर:** धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवशंभू पाईक परिवाराच्या वतीने शिवकालीन शस्त्रास्त्रे, अस्त्रे तसेच गडकिल्ल्यांचे दोन दिवसीय प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. लि. भो. चांडक विद्यालयाच्या डॉ. हेडगेवार सभागृहात आयोजित या प्रदर्शनाची सुरुवात १३ मे रोजी झाली. विदर्भाचे प्रवेशद्वार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मलकापुरात आयोजित या उपक्रमाला इतिहास अभ्यासकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या जन्मोत्सवानिमित्त आयोजित हे प्रदर्शन विविध कार्यक्रमांच्या मालिकेतील विशेष उपक्रम असून, शिवकालीन इतिहासाची गौरवशाली परंपरा नव्या पिढीसमोर मांडण्याचा प्रयत्न यातून करण्यात आला आहे. प्रदर्शनात छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले अभेद्य गड-किल्ले, जलदुर्ग, आरमार व्यवस्था तसेच तत्कालीन युद्धांमध्ये वापरण्यात आलेल्या विविध शस्त्रास्त्रांच्या प्रतिकृती मांडण्यात आल्या आहेत. याशिवाय शिवकालीन नाणी, मोडी लिपीतील कागदपत्रे, पत्रव्यवहार आणि ऐतिहासिक नोंदींचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे शिवकालीन इतिहासाचे जिवंत दर्शन घडत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या उपक्रमामुळे युवकांमध्ये इतिहासाबद्दल जिज्ञासा निर्माण होत असून, शिवकालीन पराक्रम आणि स्वराज्याच्या वैभवाची माहिती जाणून घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. दोन दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनाला नागरिक, विद्यार्थी आणि शिवप्रेमी मोठ्या संख्येने भेट देत आहेत.

**शिवकालीन ऐतिहासिक शस्त्रास्त्रांचे आकर्षण**

इतिहास अभ्यासक व संग्राहक संतोष चंदने (पुणे) यांच्या संकल्पनेतून शिवकालीन शस्त्रास्त्रे, संस्थानिकांचे स्टॅम्पपेपर, मोडी लिपीतील कागदपत्रे तसेच देशी-विदेशी शस्त्रांची मांडणी करण्यात आली आहे. या दुर्मिळ ऐतिहासिक वस्तूंनी शिवप्रेमींना विशेष आकर्षित केले आहे.

# जनगणनेत खोटी उत्तरे, माहितीस नकार दिल्यास अदखलपात्र गुन्हा

### प्रगणकांना प्रश्नांची उत्तरे देणे बंधनकारक अन्यथा होऊ शकतो दंड; जनगणना प्रक्रिया पारदर्शक !

प्रतिनिधी १४ मे

**खामगाव:** जनगणना प्रगणकांना माहिती देण्यास टाळाटाळ करणे किंवा चुकीची माहिती देणे आता महागात पडू शकते. जनगणना कायदा, १९४८ नुसार प्रत्येक नागरिकाने अचूक माहिती देणे हे कायदेशीर बंधन असून, यात कसूर केल्यास दंडात्मक आणि कायदेशीर कारवाईची तरतूद करण्यात आली आहे.

जनगणना ही केवळ आकडेवारी नसून देशाच्या भविष्यातील धोरणांचा पाया आहे. प्रत्येक १० वर्षांनी होणारी ही प्रक्रिया प्रशासनाला शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांचे नियोजन करण्यास मदत करते. त्यामुळे यात सहभागी होणे हे प्रत्येक भारतीयाचे राष्ट्रीय कर्तव्य आहे.

यावेळच्या जनगणनेत प्रगणकांकडून विचारल्या जाणाऱ्या ३४ प्रश्नांची उत्तरे देणे नागरिकांवर बंधनकारक आहे. यामध्ये कुटुंबातील सदस्य, घराची स्थिती, उपलब्ध सुविधा आणि इतर सामाजिक-आर्थिक बाबींचा समावेश आहे. कोणतीही माहिती लपविणे हा नियमाचा भंग मानला जाईल.

**उत्तरांना नकार, खोटी माहिती देणे हा गुन्हा**

जनगणना कायदा, १९४८ च्या कलम ११ (१) (ड) नुसार, जर एखादी व्यक्ती प्रगणकाने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यास नकार देत असेल किंवा जाणीवपूर्वक खोटी माहिती देत असेल, तर तो अदखलपात्र गुन्हा ठरतो.नागरिकांना सुविधेसाठी सेल्फ इन्युमरेशन (स्व-गणना) चा पर्याय देण्यात आला आहे. नागरिक जनगणनेच्या अधिकृत पोर्टलवर जाऊन स्वतःच्या मोबाइलवरून माहिती भरू शकतात. यासाठी मिळालेला संदर्भक्रमांक प्रगणकाला दाखवल्यास प्रत्यक्ष भेटीचा वेळ वाचू शकेल.

**सर्व प्रक्रिया डिजिटल, माहिती गोपनीय !**

यंदाची जनगणना ही हायटेक पद्धतीने पार पडणार आहे. सर्व माहिती डिजिटल स्वरूपात संकलित केली जाईल.

महत्त्वाचे म्हणजे, नागरिकांनी दिलेली वैयक्तिक माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाते; ती कोणत्याही इतर कामासाठी किंवा पुराव्यासाठी वापरली जात नाही.

# कालव्याच्या अतिरिक्त पाण्याने भुईमूग पिकाचे प्रचंड नुकसान

### पंचनामा करून नुकसान भरपाई देण्याची मागणी

प्रतिनिधी १४ मे



**खामगाव:** आंबेटाकळी शेतशिवारातील मुख्य कालव्यातून अतिरिक्त पाण्याचा विसर्ग होत असल्याने शेतकऱ्यांच्या शेतात पाणी शिरून भुईमूग पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी संबंधित विभागाविरोधात तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.जयरामगड येथील शेतकरी गरमक गोपीचंद राठोड व रामदास लक्ष्मण शेगोकार यांची शेती मुख्य कालव्यालगत आहे. कालव्यातून अतिरिक्त पाणी सोडण्यात येत असल्याने ते थेट त्यांच्या शेतात शिरत आहे. परिणामी, काढणीला आलेल्या भुईमूग पिकाचे मोठे नुकसान होत असल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली.

शेतकऱ्यांनी मन प्रकल्प व्यवस्थापन उपविभाग, शिर्ला नेमाणे येथील उपविभागीय अभियंत्यांकडे तक्रार केली आहे. मात्र, कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. सध्या भुईमूग पीक काढणीच्या अवस्थेत आहे. अशा वेळी शेतात पाणी साचल्याने भुईमुगाला कोंब फुटत असून उत्पादनाच्या गुणवत्तेवर परिणाम होत आहे.

# गायी चोरण्याचा प्रयत्न फसला; दोघांना पकडले!

### नांदुरा शिवारातील घटनाः दोघांविरोधात गुन्हा दाखल

प्रतिनिधी १४ मे

**नांदुरा:** नवीन जिगाव पुनर्वसन परिसराच्या मागील बाजूस असलेल्या शेतशिवारात गोठ्यात बांधलेल्या गायी चोरण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोन संशयितांना शेतकऱ्यांनी रंगेहात पकडून पोलिसांच्या ताब्यात दिल्याची घटना १२ मे रोजी मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास घडली.

या प्रकरणी मुरलीधर सखाराम इंगळे (५०, रा. खर्चे प्लॉट, नांदुरा) यांनी नांदुरा पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, नांदुरा शिवारातील गट क्रमांक ७१ मध्ये त्यांची तीन एकर शेती असून, शेजारीच त्यांचे चुलते नामदेव विश्वनाथ इंगळे यांचा गोठा आहे. परिसरात गेल्या दीड वर्षापासून बैल चोरीच्या घटना वाढल्याने ते रात्री शेतात मुक्काम करीत होते.घटनेच्या रात्री मुरलीधर इंगळे, विजय इंगळे, नामदेव इंगळे व संजय इंगळे हे गोठ्यात झोपलेले असताना त्यांना वाहनाचा आवाज आला. बाहेर येऊन पाहणी केली असता गोठ्याजवळ (एमएच-०४-ईबी-३२२९) क्रमांकाचे मालवाहू वाहन उभे दिसले. वाहनात कुटारही टाकले होते. संशय आल्याने त्यांनी वाहनाजवळ जाऊन पाहणी केली असता, दोन व्यक्ती बाभळीच्या झाडाला बांधलेल्या गायीची दोरी सोडताना दिसले. त्यांना विचारणा केली असता, सोनज येथे गायी घ्यायला जात आहोत, अशी उडवाउडवीची उत्तरे त्यांनी दिली. संशय अधिक बळावल्याने मुरलीधर इंगळे यांनी तत्काळ डायल ११२ वर संपर्क साधून पोलिसांना बोलावले.

त्यानंतर, दोघांना वाहनासह पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. या प्रकरणी नांदुरा पोलिसांनी सै. सादाब सै. अशफाक व शे. अलबक्श शे. अजगर (दोघे रा. गैबीनगर, नांदुरा) यांच्याविरुद्ध भारतीय न्यायसंहितेच्या कलम ६२ व ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# २० मे रोजी औषध विक्रेत्यांचा बंद; जिल्हा प्रशासन सज्ज

प्रतिनिधी १४ मे

**बुलढाणा :** अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटना यांच्या वतीने २० मे रोजी देशव्यापी एक दिवसीय औषध विक्रेता बंदची घोषणा करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात नागरिकांना आवश्यक औषधांचा पुरवठा सुरळीत व अखंडपणे उपलब्ध राहावा यासाठी अन्न व औषध प्रशासन, बुलढाणा कार्यालयामार्फत आवश्यक उपाययोजना करण्यात येत असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त (औषधे) गजानन प्र. घिरके यांनी दिली.

देशातील ठोक व किरकोळ औषध विक्रेत्यांनी त्यांच्या प्रलंबित मागण्यांच्या निषेधार्थ हा बंद पुकारला असून, नागरिकांना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी प्रशासन सतर्क झाले आहे. सह आयुक्त (औषधे), अन्न व औषध प्रशासन, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील सर्व औषध विक्रेते, रुग्णालयांशी संलग्न औषध दुकाने तसेच २४ तास सुरू असणाऱ्या औषध दुकानांशी समन्वय साधण्यात येत आहे. अत्यावश्यक औषधांचा पुरवठा खंडित होऊ नये यासाठी संबंधितांना पुरेसा औषध साठा उपलब्ध ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस प्रशासन, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, इंडियन मेडिकल असोसिएशन तसेच खाजगी व निमसरकारी रुग्णालयांशी सतत संपर्क ठेवून आवश्यक खबरदारी घेण्यात येत आहे. प्रत्येक तालुका व गाव पातळीवर आवश्यक औषध दुकाने सुरू राहतील यासाठी प्रशासन प्रयत्नशील असून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही प्रशासनाने केले आहे.

# मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाच्या निवड पध्दतीत मोठा बदल

प्रतिनिधी १४ मे

**शेंदुर्जन :** राज्यातील ग्रामपंचायतींचा कारभार अधिक पारदर्शक, कार्यक्षम आणि डिजिटल करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या 'मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियाना'च्या निवड प्रक्रियेत राज्य शासनाने महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. यापूर्वीच्या निवड पद्धतीतील संदिग्धता दूर करून स्पर्धेत अधिक पारदर्शकता आणण्यासाठी ग्रामविकास विभागाने बुधवारी, १३ मे २०२६ रोजीनवीन शासननिर्णय (जी.आर.) निर्गमित केला आहे. स्पर्धाआता अधिक चुरशीच आहे. निवडीचे नवे टप्पेः राज्य शासनाने या अभियानांतर्गत तालुका ते राज्य स्तरापर्यंतचे निवडीचे निकष अत्यंत स्पष्ट केले आहेत. नवीन नियमांनुसार निवडीची साखळी खालीलप्रमाणे असेल. तालुका स्तर- प्रत्येक तालुक्यातील प्राप्त प्रस्तावांची छाननी करून सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या प्रथम ३ ग्रामपंचायतींची 'तालुकास्तरीय अत्युत्कृष्ट ग्रामपंचायत' म्हणून निवड केली जाईल. विशेष म्हणजे, उत्कृष्ट काम करणाऱ्या पण मुख्य स्पर्धेत मागे राहिलेल्या इतर २ ग्रामपंचायतींना 'विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात येईल. जिल्हा स्तर- तालुक्यातील प्रथम २ क्रमांकाच्या ग्रामपंचायतींना जिल्हा स्तरावरील स्पर्धेसाठी बढती मिळेल.

# तरुणीचे अश्लील फोटो काढून अत्याचाराचा प्रयत्न

प्रतिनिधी १४ मे

**शेगाव:** हॉटेलमध्ये रोजंदारीवर काम करणाऱ्या तरुणीचे अश्लील फोटो काढून ते व्हायरल करण्याची धमकी देत शारीरिक संबंधासाठी दबाव टाकल्याचा धक्कादायक प्रकार शेगावात उघडकीस आला आहे. याप्रकरणी आरोपी ज्ञानेश्वर नरहरी लिप्ते (४५) याच्याविरुद्ध विनयभंग व अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित तरुणीने दिलेल्या तक्रारीनुसार, ती हॉटेलमध्ये रोजंदारीवर काम करत होती. २५ डिसेंबर २०२० रोजी सायंकाळी आरोपीने तिच्या परिस्थितीचा गैरफायदा घेत अश्लील फोटो काढले. त्यानंतर धमकी देत तिचा विनयभंग केल्याचे तक्रारीत नमूद आहे, तसेच आरोपीने पीडितेला हॉटेलच्या छतावर नेऊन अत्याचाराचा प्रयत्न केला. पीडितेने विरोध केल्यानंतर आरोपीने अश्लील फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिली. यानंतरही आरोपीकडून वारंवार त्रास दिला जात असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. पीडितेने शारीरिक संबंधास नकार दिल्यानंतर आरोपीने जातीवाचक शिवीगाळ करीत मारहाण केल्याचेही समोर आले आहे. सततच्या त्रासाला कंटाळून पीडितेने अखेर मंगळवारी रात्री शेगाव शहर पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांसह अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा नोंदविला आहे. पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
गुरुवार, दि. १४ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## गोवंश तस्करी; ३४ बैलांची सुटका, २६.८० लाखांचा मुद्देमाल जप्त

**यवतमाळ :** अवैध गोवंश तस्करीविरोधात शिरपूर पोलिसांनी मंगळवारी मध्यरात्री मोठी कारवाई करत ३४ गोवंशीय बैलांची सुटका केली. या कारवाईत २० लाख रुपये किमतीचा अशोक लेलँड कंटेनर आणि ६ लाख ८० हजार रुपये किमतीचे बैल असा एकूण २६ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस स्टेशन शिरपूर येथे मिळालेल्या गुप्त माहितीनुसार सपोनि संतोष मनवर, ठाणेदार शिरपूर यांनी पथकासह शिरपूर-चारगाव चौकी परिसरात नाकाबंदी केली. दरम्यान वणीकडून शिरपूरकडे येणारा संशयित अशोक लेलँड कंटेनर (क्र. एनएल ०१ एजी १२८८) थांबवून तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान वाहनात ३४ गोवंशीय बैल एकमेकांना आखूड दोरीने बांधलेल्या अवस्थेत आढळले. जनावरांच्या वाहतुकीबाबत चालकाकडे चौकशी केली असता कोणतीही वैध कागदपत्रे अथवा समाधानकारक माहिती मिळाली नाही. त्यामुळे संबंधित जनावरे कत्तलीसाठी नेण्यात येत असल्याचा संशय बळावल्याने पोलिसांनी वाहन ताब्यात घेतले.

# जिल्ह्यातील सहा हजारांवर विद्यार्थ्यांच्या भविष्याशी 'एनटीए'चा खेळ!

## पेपर फुटीमुळे नीट परीक्षा रद्द; विद्यार्थ्यांच्या दोन वर्षांच्या मेहनतीवर पाणी




प्रतिनिधी १४ मे

**अकोला :** दोन वर्षांची कठोर मेहनत घेतल्यानंतर विद्यार्थ्यांनी नीटची परीक्षा दिली. या कालावधीत त्यांनी आपल्या व कुटुंबाच्या सुख-दु:खावर पाणी सोडत दोन वर्ष एकप्रकारे तपश्चर्याच केली. त्या तपश्चर्येचे फळ आता चाखायला मिळेल, या अपेक्षेत असतानाच अचानक नीटची परीक्षा रद्द झाल्याचे कळताच त्यांच्या मेहनतीवर व त्यागावर एनटीएने घाला घातला आहे. परीक्षा संपून उणेपुरे १० दिवस होत नाही तोच 'नीट'ची परीक्षा रद्दचा बॉम्ब त्यांच्यावर पडला आणि जिल्ह्यातील ६ हजार ६३९ विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या पार चिंधड्या उडाल्या आहेत. एकूणच सर्व प्रकारात विद्यार्थ्यांचा काय दोष? त्यांच्या मानसिकतेसोबत नियतीपेक्षाही क्रूर खेळ खेळण्याचा अधिकार यांना कोणी दिला, असा संतप्त सवाल आता पालक वर्गातून व्यक्त होत आहे. वैद्यकीय अभ्यासक्रमांसाठीची प्रवेश परीक्षा 'यूजी नीट'च्या पेपरफुटी ही परीक्षा रद्द करण्यात येत आहे. असा मॅसेज राष्ट्रीय चाचणी संस्था (एनटीए) यांच्याकडून देण्यात आला आहे. त्यामुळे देशभरातील २३ लाख उमेदवारांसह अकोला जिल्ह्यातील ६ हजार ६३९ विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. आता त्यांना ही परीक्षा पुन्हा द्यावी लागणार आहे. मात्र त्यावेळचा जोम, उत्साह अन् ऊर्जा कोठून आणणार, असा प्रश्न विद्यार्थ्यांना पडला आहे.

परीक्षा यंत्रणेवरी विश्वास कायम राहण्यासाठी पुन्हा परीक्षा 'परीक्षेच्या प्रक्रियेतील पारदर्शकता जपली जावी आणि या राष्ट्रीय परीक्षा यंत्रणेवरील विश्वास कायम राहावा, या हेतूने ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला', असे एनटीएने एक्सवर पोस्ट करीत स्पष्ट केले. 'याबाबत मिळालेल्या माहितीचे आम्ही केंद्रीय यंत्रणांच्या साथीने परीक्षण केले. केंद्रीय तपास यंत्रणांच्या हाती ठोस माहिती लागल्यानंतर केंद्र सरकारच्या मंजुरीनंतर ३ मे रोजी झालेली ही परीक्षा रद्द करण्याचा आम्ही निर्णय घेतला. या परीक्षेच्या नव्या वेळापत्रकाबाबत स्वतंत्रपणे अधिसूचना काढण्यात येईल', असे एनटीएतर्फे सांगण्यात आले.

### वेगळे परीक्षा शुल्क भरावे लागणार नाही

'या पेपरफुटीची सीबीआयमार्फत चौकशी करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला असून, आम्ही सीबीआयला पूर्ण सहकार्य करू. या तपासासाठी आवश्यक सामग्री, नोंदी त्यांना पुरवण्यात येतील. विद्यार्थीहित डोळ्यांसमोर ठेवूनच ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना यासाठी नव्याने नोंदणी करावी लागणार नाही, तसेच वेगळे परीक्षा शुल्क भरावे लागणार नाही', असेही एनटीएने स्पष्ट केले.

### संभाव्य प्रश्नपत्रिका आधीच व्हायरल

'सध्या या परीक्षेच्या संभाव्य प्रश्नपत्रिकेवर (गेस पेपर) तपास केंद्रित करण्यात आला आहे', अशी माहिती राजस्थानचे अतिरिक्त पोलिस महासंचालक विशाल बन्सल यांनी दिली. 'ही संभाव्य प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष परीक्षेपूर्वीच म्हणजे, एक महिना ते १५ दिवस आधी पोहोचली होती, असे तपासात नोंदवण्यात आले आहे. या पेपरफुटीवरून अनेक चुकीच्या धारणा निर्माण झाल्या आहेत. या प्रश्नपत्रिकेत ४१० प्रश्न होते व त्यातील सुमारे १२० प्रश्न रसायनशास्त्राच्या पेपरमध्ये आले असा आरोप आहे', असेही बन्सल म्हणाले. काही विद्यार्थ्यांना परीक्षेपूर्वी केवळ ४२ तास आधी हा गेस पेपर व्हॉट्स?पवरून मिळाला, असेही सांगण्यात येते.

# दोन सिलेंडर असल्यावरही काय फायदा? मिळतोय एकच...!

## 25 दिवसानंतर बुकिंगची अट शिथिल करण्याची मागणी

प्रतिनिधी १४ मे

स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडर मागणीची नोंदणी २५ दिवसांनंतरच करता येईल, ही अट आता प्रशासनाने शिथिल करावी, अशी मागणी होत आहे. मार्च महिन्यापासून नागरिकांना या अटीमुळे गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. अडीच महिन्यांपेक्षा जास्त कालावधी आता लोटला असून, २५ दिवसांची नोंदणीची अट आता हटवावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. २५ दिवसांनंतर बुकिंग जरी होत असली तरी सिलिंडरचा पुरवठा तातडीने २६व्या दिवशी होईलच, याची कुठलीही शाश्वती नाही.

**अकोला :** ज्या नागरिकांनी मोठ्या हौसेने सिलेंडरसाठी कोणापुढे हात पसरावे लागू नयेत म्हणून वाढीव रक्कम देत दोन सिलिंडरची नोंदणी करत खरेदी केले आहेत, त्यांनाही मार्चपासून दर २५ दिवसांना केवळ एक सिलिंडर दिला जात आहे. यामुळे दोन सिलिंडर केवळ कागदोपत्री उरले आहेत. शासनाने हे निर्बंध हटवावेत, अशी मागणी आता त्रस्त नागरिकांकडून केली जात आहे. लग्नसराई सुरू असल्याने २५ दिवसांच्या आत अनेक कुटुंबांमध्ये सिलिंडर संपतो. त्यामुळे गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

आखाती देशांमध्ये उडालेला युद्धाच्या भडक्याची तीव्रता कमी झाली आहे. ३७ दिवसांनंतर युद्ध सीझफायरमुळे थांबले आहे. यामुळे आता तरी इंधन पुरवठा सुरळीत व्हावा. अशी अपेक्षा सर्वसामान्य नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. एकीकडे इंधन पुरवठा करणाऱ्या कंपन्यांकडून मुबलक दरी व पुरेशा प्रमाणात स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडरचा पुरवठा केला जात असल्याचा जिल्हा प्रशासनाकडून दावा केला जात आहे, तर दुसरीकडे २५ हे दिवसांत केवळ एक सिलिंडर देण्याचे निर्बंध कायम आहे? हा विरोधाभास तातडीने संपुष्टात आणावा, अशी मागणी त्रस्त नागरिकांकडून होत आहे. पुरवठा मुबलक व पुरेशा प्रमाणात आहे, तर मग निर्बंध कशासाठी आणि किती महिने ? या प्रश्नाचे उत्तर ना प्रशासनाकडून दिले जात आहे, ना सरकारकडून, असे नागरिकांचे म्हणणे आहे. पाच व्यक्तींच्या कुटुंबाला एक सिलिंडर २५ दिवस पुरेल, याची शाश्वती देता येत नाही.



# मुलीच्या कन्यादानावेळी वडिलांचा करुण अंत... आनंदी वातावरण क्षणात दु:खात बदलले!

प्रतिनिधी १४ मे

### चार महिन्यांपूर्वी झाली बायपास शस्त्रक्रिया

कुरूमदास भुतेकर यांच्या आईचे २६ डिसेंबर रोजी निधन झाले. त्याच महिन्यात हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांच्यावर बायपास शस्त्रक्रिया करण्यात आली होती. मुलगा विशालचा विवाह २१ एप्रिल रोजी पार पडला. एकवीस दिवसांच्या अंतराने मुलीचा विवाह लावण्यात आला.

**बुलढाणा :** सनई चौघड्यांचे सूर, मंगलाष्टकाचे स्वर, डीजेचा दणदणाट आणि आनंदानं उपस्थित असलेले वऱ्हाडी पाहुणे अशा मंगलमय वातावरणात मुलीचा विवाह सोहळा पार पडला. मात्र, बिदाई करण्यापूर्वी कन्यादानावेळी वधू पित्याचा हृदयविकाराने दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेनं लग्नाचा आनंद क्षणात दुःखात परिवर्तित झाला. नववधू आणि वरासह उपस्थित सर्वांवर शोककळा पसरली. बुलढाणा जिल्ह्यातील वरदडी बुद्रुक येथे मंगळवारी १२ मे रोजी सायंकाळच्या सुमारास ही दुर्दैवी घटना घडली. कुरुमदास पुंडलिक भुतेकर (५०) असं या वधू पित्याचं नाव आहे. भुतेकर यांची कन्या नंदिनी हिचा विवाह जालना जिल्ह्यातील मंठा तालुक्यातील आर्डा (तोलाजी) येथील रहिवासी प्रदीप महादेव नानोटे यांच्याशी निश्चित झाला होता. आपल्या लाडक्या लेकीचा संसार सुखाचा व्हावा आणि विवाहसोहळा अविस्मरणीय व्हावा यासाठी भुतेकर गेल्या अनेक दिवसांपासून धावपळ करीत होते. त्यांनी स्वतः घरोघरी आणि नात्यागोत्यात जाऊन प्रत्येकाला लग्नाचं आग्रहाचं निमंत्रण दिलं होतं. लग्नाच्या दिवशी मंगळवारी १२ मे रोजी दुपारपर्यंत लग्न घरात प्रचंड उत्साह आणि आनंदाचं वातावरण होतं. दोन्ही बाजूचे पाहुणे आणि वऱ्हाडी मंडळी उपस्थितीत हा विवाह सोहळा अत्यंत आनंदी वातावरणात पार पडला.

# 3 जनावरे व 400 किलो गोवंश मांसासह अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी १४ मे



**अकोट :** अकोट शहर पोलिसांच्या डी.बी. पथकाने पहाटेच्या सुमारास धाडसी कारवाई करत ३ जिवंत बैल, सुमारे ४०० किलो गोवंश मांस व कत्तलीसाठी लागणारे साहित्य असा एकूण २ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून दोन आरोपी फरार झाले आहेत.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, बुधवार दि. १३ मे रोजी पहाटे साडेचार वाजताच्या सुमारास अकोट शहर पोलीस स्टेशनच्या डी.बी. पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक निलेश बारहाते यांना गोपनीय माहिती मिळाली की, कुरेशीपुरा परिसरातील शौकतअली चौक येथे काही इसम घरामध्ये गोवंश जनावरांची कत्तल करीत आहेत. माहितीची खातरजमा करून पोउपनि निलेश बारहाते यांनी पथकासह तत्काळ घटनास्थळी धाड टाकली. पंचांसमक्ष करण्यात आलेल्या या कारवाईदरम्यान चार इसम गोवंश जनावरांची कत्तल करताना आढळून आले. पोलिसांना पाहताच दोन आरोपी घटनास्थळावरून पसार झाले, तर दोन आरोपींना पाठलाग करून ताब्यात घेण्यात आले. या कारवाईत पोलिसांनी ४०० किलो गोवंश मांस, ३ जिवंत बैल तसेच कत्तलीसाठी वापरण्यात येणारे साहित्य असा अंदाजे २ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये निसार अहमद अब्दुल रहेमान (वय ४८, रा. कसाबपुरा, अकोट) व शेख इलीयास अहमद अब्दुल बशीर (वय ४६, रा. इफ्तेखार प्लॉट, अकोट) यांचा समावेश आहे.तर शेख इरफान शेख हनीफ (वय ५२, रा. शौकतअली चौक, अकोट) व शेख मुश्ताक शेख कदीर (वय ६५, रा. शौकतअली चौक, अकोट) हे आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. फरार आरोपींवरही कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# पीकेव्ही पुलापासून स्टेट बँक पर्यंत पथदिवे..!

प्रतिनिधी १४ मे

**अकोला:** पीकेव्ही पुलापासून स्टेट बँक कृषी विकास शाखेपर्यंत रस्त्यावरील पथदिवे बंद आहेत. यामुळे रात्रीच्या वेळी वाहन चालकांना समस्या भेडसावत आहेत. विशेष म्हणजे दोन महिने झाले तरी अद्याप पथदिवे सुरू झाले नाही अशी ओरड होत आहे. या रस्त्यावर पथदिवे सुरू करण्यात यावे अशी मागणी आहे.

रात्री उशिरापर्यंत या मार्गावर वाहनांची ये जा सुरू असते. आणि पथदिवे बंद राहिले तर अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. अत्यंत वर्दळीच्या मार्गांवरील पथदिवे दोन महिने बंद राहणे संयुक्तिक नाही. या भागातील पथदिवे तातडीने सुरू करावे अशी मागणी आहे.

# पोलीस विभागही देणार काय पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद?

प्रतिनिधी १४ मे

**अकोला:** नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना इंधनाची बचत करण्याचे आवाहन केले आहे. त्यामुळे राज्य शासनाने आपल्या सर्वच विभागांना इंधनाची बचत करण्याचे आदेश दिले आहेत. पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून स्थानिक पोलीस विभागही इंधन वाचवण्यासाठी प्रयत्न करणार काय? हा प्रश्न निर्माण होत आहे. त्यासाठी कैद्यांना न्यायालयात हजर करण्यासाठी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगवर भर द्यावा लागेल . यामुळे इंधनात लाखो रुपयांची बचत होईल. अकोल्याच्या तुरुंगात हजाराहून हून अधिक कैदी आहेत, कैद्यांना दुसऱ्या शहरात नेण्यासाठी पोलीस दलाच्या वाहनांचा अथवा बस किंवा रेल्वेचा वापर करावा लागतो त्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च येतो. इंधन वाचवण्याच्या पंतप्रधानांच्या आवाहनानंतर, स्थानिक पोलीस कैद्यांना प्रत्यक्ष नेण्याऐवजी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संबंधित न्यायालयांमध्ये हजर करणार काय? कारण तुरुंग प्रशासनाला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगवर भर देण्यास सांगितले आहे. यामुळे दरमहा इंधनात लाखो रुपयांची बचत होण्याची अपेक्षा आहे. परंतु पोलिसांना गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्यासाठी गस्त घालने आवश्यक आहे. त्यासाठी पोलीस विभाग काय उपाय करणार हे पाहणे सुद्धा तेवढेच महत्त्वाचे आहे.

# जुन्या वादातून ६० वर्षीय वृद्धाची हत्या!

प्रतिनिधी १४ मे

**अकोला:** जुन्या वादाच्या कारणावरून एका ६० वर्षीय वृद्धाची हत्या केल्याची धक्कादायक घटना बाळापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील व्याळा गावात घडली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांनी आरोपीला अवघ्या काही वेळातच बेड्या ठोकल्या आहेत.

प्राप्त माहितीनुसार, मृत व्यक्तीचे नाव हरिदास वानरे ६० वर्षे असे आहे. आरोपी सुधाकर गाडगे आणि हरिदास वानरे यांच्यात जुना वाद होता. याच वादातून आरोपीने लाकडी राफ्टरने (लाकडी दांडा) हरिदास वानरे यांच्या डोक्यावर जोरदार प्रहार केला. हा हल्ला इतका भीषण होता की, रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या वानरे यांचा जागीच वेदनादायक मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच बाळापूर पोलिसांनी तातडीने घटनास्थळ गाठले. पोलिसांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय सर्वोपचार रुग्णालयात पाठवला आहे.

# अखेर 'त्या' विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका सहा दिवसांनंतर अपलोड!

## अमरावती मंडळाचा भोंगळ कारभार उघड

प्रतिनिधी १४ मे

**अकोला :** दहावीचा निकाल ८ मे रोजी ऑनलाइन जाहीर झाल्यानंतर अमरावती बोर्डांतर्गत येणाऱ्या पाच जिल्ह्यांमधील जवळपास ७५ विद्यार्थ्यांचा निकाल राखीव ठेवण्यात आला होता. त्यामुळे या विद्यार्थ्यांच्या पालकांना चांगलाच मनस्ताप सहन करावा लागला असून, यातून अमरावती मंडळाचा भोंगळ कारभारही उघड झाला होता. त्यांनी पुणे येथील शिक्षण संचालक मंडळाकडून चूक झाल्याचे सांगितले. विशेष म्हणजे अकरावी प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यात ऑनलाइन गुणपत्रिका अपलोड करण्याची तारीख १३ मे ही शेवटीची असल्याने हे पालक चिंतेत सापडले होते. अखेर शेवटच्या क्षणी १३ मे रोजी दुपारी १२ वाजेनंतर ऑनलाइन अपलोड केल्याने पालकांनी सुटकेचा नि:श्वास सोडला आहे. आता त्यांच्या अकरावी प्रवेश प्रक्रियेचा मार्ग मोकळा झाला आहे.





# पाऊस तसेच श्रींची पालखी येण्याआधी डाबकी रोड चे काम होईल का पूर्ण

प्रतिनिधी १४ मे

**अकोला :** येत्या पावसाळ्यापूर्वी आणि संत शिरोमणी श्री गजानन महाराजांची पालखी येण्यापूर्वी मागील बऱ्याच दिवसांपासून रखडलेल्या डाबकी रोड चे बांधकाम पूर्ण करण्याची मागणी परिसरातील नागरिक करीत आहेत. दाबकी रोडच्या विस्तारीकरणासाठी मागील अनेक दिवसांपासून मुख्य रस्त्यावर खोदकाम सुरू करण्यात आले आहे. मात्र, या कामामुळे वाहतुकीचे योग्य नियोजन न झाल्याने कस्तुरबा दवाखाना ते गायगाव रेल्वे गेट पर्यंत वाहनधारकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.रस्त्याच्या एका बाजूचे काम सुरू असल्याने ज्या बाजूने वाहतूक सुरू आहे त्या रस्त्यावर वाहन चालक तसेच वाट सरांना मोठी कसरत करावी लागत आहे. एकेरी मार्गावर दोन्ही बाजूंनी वाहने आल्याने मोठी वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. एकाच रस्त्याने दुहेरी वाहतूक होत असल्याने वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत असून यामुळे छोटे-मोठ्या अपघाताच्या घटनाही होत आहेत.

### नागरिकांना धुळीचा त्रास

डाबकी रोड चौक ते पुढे रस्ता ठिकठिकाणी खोदण्यात आला आहे. काही ठिकाणी क्रॉसिंगसाठी केलेले खोदकाम व्यवस्थित न बुजवल्याने दगड-माती रस्त्यावर पसरली आहे, तर काही ठिकाणी मातीचे ढिगारे साचल्याने वाहन चालवणे कठीण झाले थोडाही पाऊस झाल्यास वाहने घसरत आहेत. धुळीमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही निर्माण झाला आहे.



### अनेक ठिकाणी पथदीप बंद प्रशासनाकडून तत्परतेची अपेक्षा

जागोजागी सुरू असलेले खोदकाम, बंद असलेले पथदीप आणि अपूर्ण कामा या मार्गावर अपघाताचा धोका वाढवत आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने ल देऊन कामाचा वेग वाढवावा, अशी मागणी परिसरातून होत आहे. मागील अनेक वर्षांपासून नागरिक या समस्येचा सामना करीत आहेत पावसाळयात तर या रस्त्यावरून जीव मुठीत धरून ये जा करावी लागते. लवकरच संत शिरोमणी श्री गजानन महाराजांच्या पालखीचे याच रस्त्याने आगमन होईल. मागील दोन वर्षांपासून पालखीसोबत येणाऱ्या शेकडो वारकऱ्यांना तसेच दर्शनासाठी येणाऱ्या हजारो नागरिकांना या समस्येचा सामना करावा लागत आहे हे पाहता पालखी येण्याआधीच या रस्त्याचे काम पूर्णत्वास न्यावे अशी मागणी नागरिक करीत आहेत

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK